
गुरुवार, 26 मे 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 266
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 26 MAY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-266 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5



## काश्मीरमध्ये हिंसाचार घडवणाऱ्या यासिन मलिकचा पापाचा घडा भरला

### कोर्टाकडून जन्मठेपेसह १० लाखांचा दंड

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सुरक्षेच्या कारणास्तव बंदी घालण्यात आलेल्या जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंटचा प्रमुख यासिन मलिक याच्यासंदर्भातील टेरर फंडिंग प्रकरणाची सुनावणी पूर्ण झाली आहे. दिल्लीच्या एनआयए कोर्टाने या प्रकरणाचा निर्णय राखून ठेवला होता. एनआयए कोर्टाने यासिन मलिकला फाशी देण्याची मागणी केली होती. यासिन मालिकच्या प्रकरणाची सुनावणी सुरु असल्याने कोर्ट परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. पतियाळा कोर्टाने यासिन मलिकला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. यासिन मलिकला १० लाखांचा दंड आणि जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

एनआयए कोर्टाने गुरुवारी यासिन मलिकला दोषी ठरवले आहे. यासिन मलिकने कोर्टातील सुनावणीदरम्यान काश्मीरमधील दहशततादी घटनांमध्ये सहभागी असल्याचे मान्य केले होते. यासिन मलिकला दिल्लीतील पतियाळा कोर्टात आणले गेल्यानंतर त्याच्या शिक्षेवर युक्तिवाद करण्यात आला होता. त्यानंतर कोर्टाने निर्णय राखून ठेवला होता. पतियाळा कोर्टाबाहेर सीएपीएफ आणि विशेष दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत. पतियाळा कोर्टात उपस्थित असलेल्या वकिलांनी दिलेल्या माहितीनुसार यासिन मलिक न्यायालयाच्या निर्णयावर भाष्य करणार नाही, अशी माहिती दिली आहे. एनआयएने यासिन मलिकला फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, कोर्टाने त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. जम्मू काश्मीरमधील दहशतवादी आणि बेकायदेशीर कारवायांसाठी पैसे जमवण्यासाठी जगभरात एक नेटवर्कची निर्मिती यासिन मलिकने केली होती. एनआयएने ३० मे २०१७ मध्ये एक केस दाखल केली होती. या प्रकरणी १८ जानेवारी २०१८ मध्ये चार्जशीट दाखल करण्यात आली होती.

## जगाला भरली धडकी

### भारताने गहू निर्यात रोखल्याने टंचाईची स्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**दावोस : भारताने गहू निर्यात रोखण्याचा निर्णय घेतल्यामुळे जगभरात खळबळ माजली आहे. अनेक देशांमध्ये धान्याचा तुटवडा निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रमुखांनी भारताच्या निर्णयाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. आम्ही भारताची परिस्थिती समजू शकतो. मात्र त्यांनी निर्यात बंदीचा पुनर्विचार करण्याची मागणी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रमुख क्रिस्टालिना जॉर्जिवा यांनी केली आहे. शक्य तितक्या लवकर निर्यात बंदीचा पुनर्विचार करण्याचे आवाहन जॉर्जिवा यांनी केले आहे. यावर भारत सरकारने अद्याप तरी भूमिका मांडलेली नाही.**

भारताने आठवड्याभरापूर्वी गव्हाची निर्यात रोखण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाबद्दल जगभरातून चिंता व्यक्त आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रमुख असलेल्या क्रिस्टालिना जॉर्जिवा यांनीही वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये भारताच्या निर्णयाबद्दल काळजी व्यक्त केली. भारतासारखाच विचार जगातील इतर देशदेखील करू शकतात. त्यामुळे जागतिक स्तरावर अडचणी वाढतील आणि या अडचणींचा सामना करण्यास जग सज्ज नाही, असे जॉर्जिवा म्हणाल्या.

भारताची स्थिती मी समजू शकते. त्यांना १३५ कोटी लोकांचे पोट भरायचे आहे. उष्णतेच्या लाटांमुळे तिथे गव्हाचे उत्पादन कमी झाले. त्यांची अडचण मी समजू शकते. पण माझी भारताला विनंती आहे. त्यांनी



गव्हावरील निर्यात बंदीचा पुनर्विचार करावा. कारण अनेक देश भारताच्या पावलावर पाऊल टाकू शकतात. त्यामुळे धान्य पुरवठ्याचे संकट अधिक गहिर होऊ शकते, अशी भीती जॉर्जिवा यांनी बोलून दाखवली. भारताने निर्यात बंदी हटवल्यास किती मदत होऊ शकते, असा प्रश्न जॉर्जिवा यांना विचारण्यात आला. त्यावर रशिया आणि युक्रेन यांच्यात तीन महिन्यांपासून सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम गव्हाच्या पुरवठ्यावर झाल्याचे त्यांनी सांगितले.

भारत किती गहू निर्यात करू शकतो आणि कोणकोणत्या देशांना पुरवठा करू शकतो हे पाहणे महत्त्वाचे असेल. भारताने इजिप्त आणि लेबॅनॉनसारख्या देशांना गहू निर्यात केल्यास खूप मोठा फरक पडेल. कारण या देशांमध्ये गव्हाची कमतरता आहे. या देशांसमोर उपासमारीचे संकट उभे ठाकले आहे. त्यामुळे सामाजिक अशांतता निर्माण होऊ शकते. तसे घडल्यास जागतिक शांतता धोक्यात येईल, असे जॉर्जिवा म्हणाल्या.



## यंदाची वारी अधिक प्रभावीपणे 'निर्मल वारी' व्हावी

### पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी समन्वयाने काम करावे : जिल्हाधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी पाणी, शौचालय, वाहतूक व्यवस्था, रस्ते, आरोग्य सुविधा आदी सर्व सोयी सुविधा योग्य पद्धतीने उपलब्ध करून देण्यासह पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी दिले.

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थान आणि संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान पालखी सोहळ्याबाबत पूर्वतयारी आढावा बैठक डॉ. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी पुणे महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, निवासी उपजिल्हाधिकारी हिम्मत खराडे, श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे मुख्य विश्वस्त ॲड. विकास ढगे-पाटील, श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. माणिक मोरे आदी उपस्थित होते.

दोन वर्षानंतर पालखी सोहळा होणार असल्याने मोठ्या प्रमाणात भाविक संख्या राहण्याचा अंदाज असल्याचे सांगून डॉ. देशमुख म्हणाले, भाविकांची कोणतीही अडचण होणार नाही यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून त्यासाठी गेली ३-४ महिन्यापासून पालखीबाबत नियोजन सुरू आहे. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यांच्यासोबत पालखी सोहळा प्रमुखांसमवेत बैठका घेऊन तसेच पालखी मार्ग, पालखी मुक्काम येथील पाहणी केली आहे. जिल्ह्याला वारीची असलेली दीर्घ परंपरा कायम ठेवण्यासाठी सर्व यंत्रणा नेहमीप्रमाणे संपूर्ण योगदान देतील असा विश्वास व्यक्त करून जिल्हाधिकारी म्हणाले, या वर्षीचा पालखी सोहळा आगळा वेगळा राहील यादृष्टीने सर्व नियोजन प्रभावीपणे करण्यात येईल.

पालखीमार्ग, पालखी मुक्काम या ठिकाणच्या लक्षात आलेल्या सर्व त्रुटी १० जूनपर्यंत दूर कराव्यात. यावर्षीची वारी अधिक प्रभावीपणे 'निर्मल वारी' व्हावी यासाठी सर्व ते प्रयत्न करू असेही ते म्हणाले.

## राहुल गांधींचा लंडन दौरा वादाच्या भोवऱ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी सध्या लंडन दौऱ्यावर आहेत. मात्र, राहुल गांधी यांचा हा दौरा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. राहुल गांधी यांनी लंडन दौऱ्यापूर्वी परराष्ट्र मंत्रालयाकडून राजकीय मान्यता घेतलेली नसल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. प्रत्येक खासदाराला परदेश दौऱ्यावर जाण्यापूर्वी परराष्ट्र मंत्रालयाची राजकीय मान्यता घ्यावी लागते. मात्र, राहुल गांधी यांनी ही मान्यता घेतली नसल्याचे सांगण्यात येत आहे.

परराष्ट्र मंत्रालयाची मान्यता अत्यावश्यक

प्रत्येक खासदाराला परदेश दौऱ्यावर जाण्यापूर्वी परराष्ट्र मंत्रालयाची राजकीय मान्यता घेणे आवश्यक असते. किमान तीन आठवडे आधी परराष्ट्र मंत्रालयाची परवानगी घ्यावी लागेल. एवढेच नाही तर सर्व खासदारांना विदेशी सरकारे, संस्था आदींकडून जर आमंत्रण थेट आले असेल, तर परराष्ट्र मंत्रालयाकडून राजकीय मंजुरी आवश्यक आहे. सर्व खासदारांना परदेश दौऱ्यापूर्वी तसे करण्याची खात्री करण्यास सांगितले आहे.

खासदारांमध्ये प्रसारित केलेल्या प्रोटोकॉलनुसार सदस्यांना राजकीय मंजुरीसाठी तीन आठवडे अगोदर परराष्ट्र मंत्रालयाच्या वेबसाइटवर अर्ज करावा लागतो. कोणत्याही परदेशी स्त्रोताकडून आलेली सर्व आमंत्रणे, म्हणजे, कोणत्याही देशाचे सरकार किंवा कोणत्याही परदेशी संस्था परराष्ट्र मंत्रालयामार्फत पाठविली जाणे अपेक्षित आहे. तथापि, असे आमंत्रण थेट प्राप्त झाल्यास, सदस्यांनी ते निदर्शनास आणणे आवश्यक आहे. त्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाची आणि त्या मंत्रालयाची आवश्यक राजकीय मंजुरी देखील घेतली पाहिजे, असा नियम आहे.

## कॅप्टन अभिलाषा बराक यांची अभिमानास्पद कामगिरी

### देशाच्या पहिल्या महिला कॉम्बॅट एव्हिएटर म्हणून रुजू ! लष्कराकडून अभिलाषा यांचा खास सन्मान !

आधुनिक केसरी न्यूज


नाशिक : कॅप्टन अभिलाषा बराक यांनी इतिहास रचला आहे. कॉम्बॅट एव्हिएटर म्हणून अभिलाषा लष्करात सहभागी झाल्या आहेत. या पदापर्यंत पोहोचणाऱ्या पहिल्या महिला अधिकारी होण्याचा मान बराक यांनी मिळवला आहे. बुधवारी लष्कराने त्यांचा सन्मान केला. प्रशिक्षणानंतर त्या लष्करात रुजू झाल्या आहेत.

अभिलाषा बराक डायरेक्टर जनरल आणि कर्नल कमांडंटट एव्हिएशनकडून प्रतिष्ठीत विंग्सने सन्मानित करण्यात आले. बराक यांचा फोटो लष्कराकडून ट्विट करण्यात आला आहे. युवा एव्हिएटर्स आता कॉम्बॅट एव्हिएशन स्क्वॉड्रनमध्ये आपले पंख फैलावू उड्डाण करत आहे, असे लष्कराने ट्विटमध्ये म्हटले आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये पहिल्यांदाच २ महिला अधिकाऱ्यांची



निवड हेलिकॉप्टर पायलट प्रशिक्षणासाठी झाली. त्या दोघींना नाशिकच्या कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूलमध्ये प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये सहभागी होण्याची इच्छा १५ महिला अधिकाऱ्यांनी व्यक्त केली होती.

सध्याच्या घडीला एव्हिएशन विभागात महिलांना ट्रॅफिक कंट्रोल आणि ग्राऊंड ड्युटी दिली जाते. मात्र आता त्यांना पायलट म्हणून जबाबदारी दिली जाईल. २०१८ मध्ये हवाई दलाच्या फ्लाईंग ऑफिसर अवनी चतुर्वेदींनी विमान घेऊ उड्डाण केले. लढाऊ विमान उडवणाऱ्या त्या पहिल्या महिला लष्करी अधिकारी ठरल्या. १ नोव्हेंबर १९८६ मध्ये एक विभाग म्हणून आर्मी एव्हिएशन कोरची (एएसी) निर्मिती करण्यात आली. लष्करातील सर्वात प्रतिष्ठित विभाग अशी एएसीची ओळख आहे. एएसीच्या उमेदवारांना नाशिकच्या कॉम्बॅट आर्मी एव्हएशन ट्रेनिंग स्कूलमध्ये (सीएटीएस) प्रशिक्षण देण्यात येते.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# चहा घ्यावा, चहा द्यावा ...!


आधुनिक केसरी

तर असा हाचहा. प्रत्येक वेळी त्याची लज्जत न्यारी. सकाळी वर्तमानपत्र वाचताना हातात चहाचा कप असला की बातम्याही चवदार होतात जणू काही...! मग मोदी काय म्हणाले, उद्धव काय म्हणाले, पवारांनी कोणती विधाने केली हे सगळे चहाच्या घोटाबरोबर वाचताना फार मजा येते. मी असं ऐकलय की रेल्वे स्टेशनवर पूर्वी चहा दोनच वेळा मिळायचा. सकाळी आणि संध्याकाळी चार वाजता. पण कोणातरी हुशार, सुज्ञ व्यक्तीने दिवसातले चोवीस तास चहा विकण्याची कल्पना शोधून काढली. पण त्याची कल्पना लोकांनी खरी ठरवली आणि लोक कोणत्याही वेळी चहा पिऊ लागले. मध्यरात्री अगदी बारा वाजता गाडी एखाद्या स्थानकावर थांबली असेल तर तेव्हाही काही महाभाग.( ..! ) चहापिताना आपल्याला हमखास दिसतील. तात्पर्य, चहाला कोणतीही वेळ वर्ज्य नाही.प्रसंग आनंदाचा असो वा दुःखाचा. चहाहा स्वागतार्ह असतो. अगदी मित्रांमधली पैज असो, नाहीतर रंगलेला गप्पांचा फड असो त्याचा शेवट चहानेच व्हायचा. चहाच्या जन्माचीही कथा मजेदार आहे. अगदी चहाच्या चवीसारखी. अशी आख्यायिका आहे की एकदा चीनचा एक सम्राट लढाईसाठी जंगलातून फिरत होता. त्यावेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने सावधानी बाळगावी म्हणून तो पाणी सुद्धा उकळून पीत असे. एकदा तो असेच थकून बसलेला असताना त्याने पिण्यासाठी गरम पाणी मागवले. तेव्हा नकळत पाण्यात झाडाची चारदोन पाने पडली. त्या पानांमुळे पाण्याचा रंग बदलला आणि त्याने कुतूहल म्हणून ते पाणी पिऊन पाहिले तर काय अप्रतिम चव, सुगंध आणि स्वाद यामुळे तो खुश झाला आणि त्याची झोप, त्याचा थकवा कुठल्या कुठे पळून गेला. आहे की नाही मजेशीर कथा ..!

तर असा हा मजेशीरचहा. या चहाचा शोध सतराव्या शतकात इंग्रजांना लागला असे म्हणतात. मग त्यांनी तो त्यांच्यासोबत भारतात आणला. ब्रिटीशांनी ज्या काही बऱ्यावाईट गोष्टींची देणगी भारताला दिली त्यात चहाया पेयाचा समावेश होतो. पण त्यांचा तो काळा, कमी उकळलेला, कमी दुध साखर घातलेला चहा आपण बदलून टाकला. त्याला भारतीय रूप दिले. जास्त उकळलेला, जास्त दुध साखर असलेला चहा आपण घ्यायला लागलो. चहाचे अनेक प्रकार आहेत. BLACK TEA, ग्रीन टी इ. पण लोकप्रियता आपल्या नेहमीच्याच चहाला लाभली बर का...!

पूर्वी ( आणि अजूनही काही वेळा ) वधू परीक्षा करताना ती मुलगी चहा, पोहे कसे देते, त्यावेळी ती कशी दिसते,चालते बोलते कशी याचे निरीक्षण केले जायचे. एकंदरीत काय चहा हा वधुपरीक्षेचा एक अविभाज्य भाग होता.

सौतन या चित्रपटात एक गाणे आहे. 'शायद मेरी शादी का खयाल दिल में आया है, इसीलिये मम्मीने तुम्हे चाय पे बुलाया है.' उषा खन्ना यांचे संगीत असलेले हे बहारदार गाणे गायिले आहे किशोरकुमार आणि लता मंगेशकर यांनी. तेव्हा मंडळी, हे गाणे ऐका. आणि चहाचा आस्वाद घ्या. वाटलं तर मलाही 'चायपे' बोलवा.



## आनंदी पहाट

# अंतर्मन विचलित होणे टाळावे

आधुनिक केसरी

नैराश्य टाळण्यासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी नियमित व्यायाम करावा, सामाजमाध्यामांच्या वापराचा वेळ कमी करावा, थेट मजबूत सामाजिक संबंध तयार करावेत, आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करावा, शारीरिक ताण आणि मानसिक तणाव कमी करावा, भरपूर झोप घ्यावी, नकारात्मक विचार, वर्तन असणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहावे, आळसावर मात करावी, आपले ध्येय व्यवस्थापित करण्यायोग्य बनवावे. अवास्तव उद्दिष्टे विचारात घेणे टाळावे, स्वतःला १०० टक्के परिपूर्ण असण्याची अपेक्षा करू नये, नकारात्मक बोलण्याऐवजी सकारात्मकतेचा वापर करावा, प्रत्येक कामाची कृती योजना तयार करावी, शक्य तितकीच ताकद वापरावी, त्यासाठी आपले कर्तृत्व ओळखावे, मदतीसाठी आप्तेष्टांचा विचार करावा, अंतर्मन विचलित होणे टाळावे. नैराश्याची चार प्रमुख कारणे असतात, ती म्हणजे कौटुंबिक इतिहास, आजार आणि आरोग्य समस्या, औषधे तसेच अल्कोहोल आणि आपले व्यक्तिमत्व होत. शरीरांतर्गत जनुके, मेंदूतील रसायने आणि सभोवतालचे वातावरण यासह अनेक गोष्टी उदासीनता येण्यास कारणीभूत ठरत असतात. अनेकांच्या जीवनातील मोठ्या बदलानंतर किंवा आघातानंतर नैराश्य येण्याची शक्यता असते. आपल्या कामाची रचना आणि दिनचर्या नसणे हे जीवनात प्रेरणा नसण्याचे एक सामान्य कारण असते. कामाच्या रचना आणि आपल्या दिनचर्या सवयींना घट्ट करण्यास मदत करतात. काहीतरी करण्याची प्रेरणा वाटण्याऐवजी कृती करणे अधिक महत्वाचे असते. डिस्टिमिया हा नैराश्याचा सौम्य परंतू दीर्घकाळ टिकणारा प्रकार आहे. याला पर्सिस्टंट डिप्रेशन डिसऑर्डर असेही म्हणतात. उदासीनतेच्या अधिक तीव्र, क्रॉनिक किंवा आवर्ती भागांनंतर असे बदल घडतात की नाही हे निर्धारित करण्यासाठी भविष्यातील अभ्यास करणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### माझ्या मना जाण | अंती सत्य ||

ज्याचे त्याचे हीत | ज्याच्या त्याच्या हाती ||
कर्माचे नसती | वाटेकरी ||१||

राग द्वेष सारा | विचारे करावा ||
अंतरी जपावा | स्नेहभाव ||२||

जगराहटीशी | जुळोनिया घ्यावे ||
स्वधर्मा जागावे | निरंतर ||३||

स्वार्थाची या बाधा | होऊ नये मना ||
अंगी ऐसे बाना | शुद्ध कर्म ||४||

सत्कर्माचे फळ | अमृताची खाण ||
माझ्या मना जाण | अंती सत्य ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**न कश्चिच्चण्डकोपानामात्मीयो नाम भूभुजाम् ।
होतारमपि जुह्वानं स्पृष्टो दहति पावकः ।।**

**अर्थ :** आहूती प्रदान करणा-या होत्यासही स्पर्श केला असता अग्नी जाळतो. त्याप्रमाणे, प्रचंड क्रोधी राजांचा कोणी आप्त असत नाही. त्याच्या क्रोधाचा ग्रास सर्वांना व्हावं लागतं. क्रोधी राज्यकर्ता किंबहुना क्रोधी माणूस हा कोणाचाच सखा नसतो. तो सखा असतो, ते केवळ आपल्या क्रोधाचा. त्यामुळे अशा क्रोधी व्यक्तीकडून रूनेहाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे; असा आशय या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी सूचित केला आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



# मुमुक्षुलक्षण

आधुनिक केसरी

मला कोणतेचं ज्ञान नाही मी सगळ्यात कमी आहे. "अशा पद्धतीने जो स्वतः ची वाईट लक्षणें वर्णन करतो तो मुमुक्षु होय. अत्यंत स्वार्थी,अनर्थ निर्माण करणारा परमार्थाचा तर लवलेशही नसलेला. असा अवगुणांची खाण असलेला मी व्यर्थ जन्माला आलो मी म्हणजे खायला कहार आणि धरणीला भार असा आहे.

अशा रीतीने जो स्वतः ची निंदा करतो,स्वतः चे असलेले दोष मान्य करतो. ज्याला मनांतून संसाराचा त्रास वाटतो. संसार नकोसा वाटतो,ज्याला सत्संगाची ऊत्कट इच्छा उत्पन्न होतेतो मुमुक्षु होय. पुष्कळ तिर्थे फिरून पाहिली,समाधीसाधने अभ्यासली अनेक ग्रंथाचे अभ्यास पूर्ण पारायणे केली तरी मनाला समाधान झाले नाही. हे सगळे बुद्धीचे अनुमान आहे, कल्पनेचा खेळ आहे असे समजले,हे लक्षात घेऊन संतांना शरण जाण्यास तयार होतो तो मुमुक्षु असतो.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सहा शमदमादि साधने.

1 )शम शांतपणा
2 )दम इंद्रिय दमन
3 )तितिक्षा सुखदुःख पचवणे.
4 ) उपरति अनासक्ति
5 ) श्रद्धा किंवा शास्त्र सद्गुरूच्या वचनी विश्वास
6 )सत्यबुद्धि आणि समाधान किंवा एकविध करण्याची कला.

देह,कुळ,द्रव्यदारा आणि इतर गोष्टींचा अभिमान बाजूला सारून जो संतांच्या चरणीं अनन्य भावाने लीन होतो तो मुमुक्षु असतो.
आपला अहंभाव बाजूला सारून जो आपण स्वतः ला अनेकदा अनेक प्रकारची नावे ठेवतों व ज्याला मोक्ष हवा आहे असे वाटू लागतो तो मुमुक्षु असतो.
ज्याला लौकिक मोठेपणाची लाज वाटते जो परमार्थासाठी झिजतो. संतचरणीं ज्याचा विश्वास बसतो. संतांबद्दल ज्याला आपलेपणा वाटतो तो मुमुक्षु असतो.
प्रापंचिकाचे सर्व व्यवहार बंधने सोडतो व आचरण परमेश्वराच्या चरणाशी वहातो तो मुमुक्षु असतो.

# कमाईतला काही वाटा समाजासाठी राखून ठेवा

आधुनिक केसरी



कमाईतला काही वाटा समाजासाठी राखून ठेवावा, अशी आपल्या पूर्वजांची शिकवण आहे. नाशिकच्या ८१ वर्षीय सुमती बापट यांनीही पोथी पारायणातून मिळालेले संपूर्ण मानधन दुष्काळग्रस्तांना देत समाजासमोर आदर्श ठेवला आहे. गजानन महाराजांच्या पोथीचे मुखोद्गत पारायण करणाऱ्या बापट यांनी आतापर्यंत अनेकांचे संसार उभे केले आहेत, तर अनेकांना त्यांनी व्यवसायासाठी मदत केली आहे.

बापट यांना गजानन महाराजांची संपूर्ण पोथी मुखोद्गत आहे. त्यांनी १९६७ मध्ये शेजारच्यांकडून ही पोथी आणून वाचली. त्यानंतर ती विकत घेऊन अखंड पारायण करायला सुरुवात केली. १९७३ मध्ये ही पोथी मुखोद्गत झाल्यानंतर त्यांनी ती कधी हाती घेण्याची गरज पडली नाही. आतापर्यंत त्यांनी भारताच्या कानाकोपऱ्यात गजानन महाराजांच्या पोथीची पारायणे केली आहेत. अहमदबाद, दिल्ली, बडोदा आदी शहरांत महाराजांचे विचार पोहोचवण्यासाठी फिरल्या. हे करीत असताना यामधून मिळणारे मानधन त्यांनी स्वतःसाठी कधीही वापरले नाही. हे सर्व मानधन त्या समाजकार्यासाठी देत आहेत. मिळालेल्या मानधनातून अनेकांच्या मुलांचे शिक्षण केले. काहींचे व्यवसाय उभे करून दिले. अनेक गावांना पाण्याच्या टाक्या बांधून दिल्या. गरीब मुलींचे लग्न लावून दिले. अनेक ठिकाणी सत्कार होतात. लोक शाली, साड्या देतात. यातील एकही वस्तू त्या स्वतःसाठी कधीही वापरत नाहीत. ''देवाच्या कृपेने मला सगळे मिळाले आहे. महाराजांनी दिलेला पैसा हा माझा नसून समाजाचा आहे. त्यासाठीच तो वापरला पाहिजे,'' असे त्या म्हणतात. येणारा पैसा माझा नाही. तो मी कशाला स्वतःसाठी खर्च करू. मला देवाने भरपूर दिले आहे; मदत करते. हा छोटासा प्रयत्न आहे.

पुण्याजवळील खेड्यात एका व्यक्तीची मोठी शेती आहे. मात्र, पाणी नसल्याने तो त्यातून काहीही उत्पन्न मिळवू शकत नव्हता. जेव्हा बापट यांना या शेतकऱ्याची कैफियत समजली, तेव्हा त्यांनी तत्परतेने त्या व्यक्तीला विहीर तयार करून दिली. कोकणातील काही गावांमध्येही विहिरी बांधून दिल्या आहेत. कुणाला एखादी वस्तू दिल्यानंतर त्याची पावती त्या घेत नाहीत. 'पावती देणारा तो बसला आहे. कागद घेऊन त्याचे काय करू,' असे त्या म्हणतात.

# राज्य सरकारविरोधात भाजयुमोचे नागपूरात आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारतीय जनता युवा मोर्चा, नागपुर महानगराद्वारे आज नागपुर शहरातील सहाही विधानसभा क्षेत्रांमध्ये राज्य सरकारद्वारे आकारण्यात येणार्या इंधनावरील शुल्काला घेऊन आंदोलने करण्यात आले व निवासी उपजिल्हाअधिकारी विजया बनकर यांच्या मार्फेत राज्य सरकारला निवेदन देण्यात आले.

जागतिक स्थरावर कच्या तेलाचे भाव हे गगनाला भिडलेले आहेत हे सर्वजण जाणतात पण असे असतांना सुद्धा देशातूल जनतेला महागाई पासुन दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने केंद्रीय उत्पादन शुल्कामधुन पट्रोलवर ८ रूपये आणि डिझेलवर ६ रूपये जनतेकरीता कर कमी केलेला आहे. यामुळे केंद्र सरकारला जवळपास २ लाख कोटींपेक्षा जास्तचा भार बसणार आहे. पण केवळ जनतेचे हित लक्षात घेता केंद्र सरकारने हे आक्रामक पाऊल उचलले. आजच्या घटकेले केंद्र सरकारचा कर हा १९ रुपये आकारते आहे व ३० रू कर हा राज्य सरकार आकारते आहे. महाराष्ट्र राज्य संपुर्ण देशामध्ये पेट्रोल व डिझेलवर सर्वात जास्त कर आकारणारे राज्य असुन जनतेच्या हितासाठी व महागाई कमी करण्यासाठी तत्काळ हे इंधनावरील कर कमी करण्यात यावे. संपुर्ण देशातील इतर राज्य १७-१८ रूपये कर आकारत असतांना महाराष्ट्र सरकारमधील महाविकास आघाडीने ऐव्हड्या




मोठ्या प्रमाणात आकारण्यात आलेला कर हा जनतेवर होणारा घोर अन्याय आहे.

भारतीय जनता युवा मोर्चा तर्फे निवेदनात म्हणण्यात आले की राज्य सरकारद्वारे आकारण्यात येणारा इंधनावरील कर हा त्वरित कमी करण्यात यावा जेणेकरून महागाईला आळा बसेल आणि जनतेला दिलासा मिळेल व जर का हे पाऊल येणार्या ३ दिवसांमध्ये म्हणजेच ७२ तासांमध्ये उचलले नाही तर संपुर्ण महाराष्ट्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर आक्रामक आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

आजचे संपुर्ण आंदोलने हे भाजपा शहर अध्यक्ष आ. प्रविण दटके व भाजयुमो प्रदेश महामंत्री शिवानी दाणी वखरे यांच्या मार्गदर्शनात व भाजयुमो शहर अध्यक्ष पारेंद्र (विक्की) पटले यांच्या नेतृत्वात घेण्यात आले. तसेच प्रामुख्याने भाजयुमो प्रदेश सचिव राहुल खंगार, कल्याण देशपांडे, भाजयुमो शहर महामंत्री सचिन करारे, दिपांशु लिंगायत, अमोल तिडके, मनिष मेश्राम, भाजयुमो प्रदेश कार्यकारिणी सदस्य देवदत्त डेहणकर, रितेश राहाटे, सचिन सावरकर, प्रसिद्धी प्रमुख प्रसाद मुजुमदार, सह-प्रमुख मनमित पिल्लारे, विद्यार्थी आघाडी संयोजक संकेत कुकडे प्रामुख्यने उपस्थित होते.

आजचे आंदोलन दक्षिण-पश्चिम नागपुरात निलेश राऊत यांच्या नेतृत्वात माजी नगरसेवक विजय चुटुले, शहर मंत्री हर्षल तिजारे, अक्षय दाणी, आशुतोश भगत, अंकीत वानखेडे उपस्थित होते. दक्षिण नागपुरात अमर धरमारे यांच्या नेतृत्वात महामंत्री आकाश भेदे, अमित बाराई, हिमाशु शुक्ला, सुरज दुबे उपस्थित होते. पुर्व नागपुरात सन्नी राऊत यांच्या नेतृत्वात आशिष मेहर, पिंटू पटेल, घनश्याम ढाले, गोविंदा काटेकर, अन्नु यादव, हर्षल मलमकर, विकास रहांगडाले, हर्षल वाडेकर, शैलेश नेताम, शुभम पठाडे, विवेक ठवकर, कार्तिक रोकडे, तुषार ठाकरे, तुषार राऊत, जयेश बिहारे, करण अग्रवाल, अतुल कावळे, प्रतिक टेटे, अनंत शास्त्रकार, विशाल बेहनिया, मंगेश लेंडे, पल्लवी गिरोले, स्वाती वाघ उपस्थित होते. मध्य नागपुरात बादल राऊत यांच्या नेतृत्वात अक्षय ठवकर, हरीश निमजे, अथर्व त्रिवेदी, रितेश पांडे, शुभम समुद्रे, समीर येवले, यश पांडे, सागर पांडे, मोनू मने, नयन भगत, प्रशांत दुर्गे, अनुप खोब्रागडे, पवन महाकालकर,सोनू वर्मा, हितेश डवले, विक्की मंडलिक, सोमेश गौर, राहुल वाटकर, रुपेश कावळे, भावेश माताघरे, शुभम मौदेकर उपस्थित होते. पश्चिम नागपुरात शेखर सुर्यवंशी यांच्या नेतृत्वात ईशान जैन, अक्षय शर्मा, गौरव पाठक उपस्थित होते. उत्तर नागपुरात पंकज सोनकर यांच्या नेतृत्वात अमित पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जय साजवाणी, सौरभ पराशर, विक्की बगले, अषिश मिश्रा प्रविन बिलसे उपस्थित होते.

## भरधाव पिकअप दुभाजक ओलांडून एसटीला धडकली

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कामगारांना घेऊन जाणाऱ्या वाहनांच्या चालकाचा ताबा सुटल्याने पिकअप वाहनाने दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने जाणाऱ्या एसटी बस ला धडकली.या भीषण अपघात पिकअप मधील चार कामगार जागीच ठार झाले तर तिघे गंभीर जखमी झाल्याची घटना आज संध्याकाळी औरंगाबाद- जालना महामार्गावरील गाढेजळगाव येथे घडली.अपघातातील मृताची संख्या वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



औरंगाबादमध्ये निर्माण झालेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नासंदर्भात आज दि.२५ मे रोजी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, जिल्हाप्रमुख तथा आ. अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे शिष्ठमंडळ पोलीस आयुक्त मुख्यालय याठिकाणी बैठक घेण्यात आली. यात कायदा व सुव्यवस्था आणखी बळकट करण्याची सूचना करण्यात आली. यावेळी मा.महापौर नंदकुमार घोडेले, पूर्व विधानसभा संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती औरंगाबाद महानगरपालिका रेणुकादास (राजु) वैद्य, पूर्व चे शहरप्रमुख विश्वनाथ स्वामी तसेच सर्व शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



यवतमाळ : उमरखेड तालुक्यातील निंगनूर येथे व परिसरात दि. 24 मे रोजी सायंकाळच्या सुमारास चक्रीवादळासह जोरदार पाऊस झाला. अचानक आलेल्या या वादळी पावसामुळे नागरिकांची दाणादाण उडाली. अनेकांच्या घरावरील पत्रे उडाली असून वादळामुळे गावातील घरांची प्रचंड नासधुस होऊन नुकसान झाले. केळीसह शेतीतील पिकांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. केळी बागांना मात्र जबर फटका बसला आहे. तुफान वादळामुळे गावामधील अनेक मोठी झाडे उन्मळून कोसळली मात्र सुदैवाने कुठलीही जिवीतहानी झाली नाही.

## वऱ्हाडी घेऊन जाणाऱ्या वाहनाचा अपघात, १४ जण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** विवाह समारंभाकरीता वऱ्हाडी घेऊन जात असलेल्या मालवाहू वाहनास अपघात होऊन १४ वऱ्हाडी जखमी झाले. ही घटना आर्णी - बोरगाव मार्गावर आज बुधवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. जखमींना तात्काळ आर्णी येथील रूग्णालयात दाखल करण्यात आले. आर्णी येथून लग्न समारंभाकरीता तालुक्यातील भंडारी शीवर येथे जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहन पलटी झाले. यात १४ जण जखमी झाले असून पाच ते सहा वऱ्हाडी गंभीर जखमी झाले. जखमींमध्ये लहान बालकांचाही समावेश आहे.

अपघात होताच मार्गावरील वाहनधारकांनी पोलिसांना माहिती देवून वैद्यकीय मदत मागवली. जखमींमध्ये सुरेश बाबर, नारायण बाबर, सुरेश तांबे, सौरभ शिंदे, मैना बालट,



राधा शिंदे, बेबी राठोड, उकंडा राठोड, रोहित शेगर, सुमन शेगर, धर्माबाई तांबे, राजू शेर, प्रदीप शिंदे, दीपक सोळंके, सुनील तांबे, आरूषी सोळंके यांचा समावेश आहे. जखमींना तात्काळ आर्णी येथील रूग्णालयात हलविण्यात आले.

## पाटात पाय घसरून युवकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** तालुक्यातील उमरी येथे मामाच्या गावी आलेल्या युवकाचा पाटात पाय घसरून मृत्यू झाल्याची घटना मंगळवार रोजी रात्री सहाच्या वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत मिळालेल्या माहितीप्रमाणे, सोनपेठ येथील बालाजी उध्दव शिंदे वय 16 वर्षे हा युवक उमरी येथे मामाच्या गावी उन्हाळ्याचा सुट्ट्या मध्ये आला होता. तो मामा सोबत शेतात गेला होता. मामा कामात व्यस्त असतांनाच बालाजी हा जवळ असलेल्या पाटात पाणी पिण्यासाठी गेला. मात्र पाणी पित



असतांना त्याचा पाय घसरून तो पाण्यात पडला. पाटात पडलेल्या बालाजीला पोहता येत नसल्यामुळे त्याचा पाटाच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला. त्याचे प्रेत शवविच्छेदनासाठी माजलगावच्या ग्रामीण रूग्णालयात पाठवण्यात आले. त्यानंतर या घटनेची अकस्मात मृत्यूची नोंद दिंद्रुड पोलिस ठाण्यात करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास दिंद्रुड पोलिस ठाण्याचे पो.काँ.बी.के. सुरेवाड हे करत आहेत.

## नवनिर्मित पोलीस भवनचे फॉल्स सीलिंग कोसळले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शहरातील नवनिर्मित पोलिस भवन इमारतीला वादळाचा मोठा तडाखा बसला. इमारतीवर झाड कोसळल्याने काही विभागातील फॉल सिलिंग कोसळले. काही दिवसांपूर्वीच पोलिस भवनाचे उद्घाटन झाले. मात्र मंगळवारी झालेल्या वादळी पावसामुळे नवीन इमारतीतील फॉल्स सेलिंग कोसळले. उष्णतेमुळे लाहीलाही झालेल्या नागपूरला मंगळवारी दुपारी वादळी वाऱ्याने चांगलंच झोडपले. काही भागात पाऊसही कोसळला. अनेक भागात अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे विज पुरवठा सुरु खंडित झाला होता. तर काही ठिकाणी झाडं उन्मळून पडली होती. ग्रामीण भागाला कालचा वादळाचा चांगलाच तडाखा बसला. काल झालेल्या वादळी वाऱ्याचा तडाखा नुकत्याच उद्घाटन झालेल्या अद्ययावत अशा पोलीस भवनाच्या इमारतीलाही बसला. हवेचा वेग इतका तीव्र होता की पोलीस भवनात इमारतीतील काही माळ्यांवरील फॉल्स सिलिंग कोसळली. या इमारतीत शहर पोलिस आयुक्त आणि ग्रामीण पोलिस अधीक्षक यांसह सर्व वरिष्ठ पोलिस अधिकारी यांचे कार्यालय आहे. एका भागात पोलिस आयुक्तालय आणि दुसऱ्या भागात ग्रामीण पोलिस अधीक्षक यांसह सर्व पर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कार्यालय आहे. वादळीवाऱ्यानंतर अचानक फॉल सिलिंग इमारतीतल्या काही माळ्यावरील कार्यालयामध्ये कोसळल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये एकच धावपळ उडाली होती.



## आफ्रिदीची गरळ

आधुनिक केसरी

काश्मीरमधील फुटीरतावादी नेता यासिन मलिकला राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) विशेष न्यायालयाने दहशतवाद्यांना आर्थिक पुरवठा केल्या प्रकरणी दोषी ठरवले आहे. यासीन मलिकने दोन आठवड्यांपूर्वी सर्व आरोप स्वीकारल्यानंतर या प्रकरणामध्ये आज पटियाला न्यायालयाने या प्रकरणात निकाल देताना यासिन मलिकला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मलिकवर गुन्हेगारी कट रचणे, देशाविरुद्ध युद्ध पुकारणे, इतर बेकायदेशीर कारवाया आणि काश्मीरमधील शांतता भंग केल्याचे आरोप सिद्ध झाले आहेत. मात्र या प्रकरणातील आजच्या सुनावणीच्या आधी पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शाहिद आफ्रिदीने भारताविरोधात गरळ ओकली आहे. ट्विटरवरुन आफ्रिदीने यासिन मलिकविरोधातील हे प्रकरण बनावट असल्याचे आरोप केले आहेत. तसेच त्याने या प्रकरणामध्ये थेट संयुक्त राष्ट्रांनी दखल द्यावी अशी मागणीही केली. जम्मू-काश्मीर फुटीरतावादी नेता मोहम्मद यासिन मलिकने दिल्ली एनआयए कोर्टात दहशतवादाशी संबंधित सर्व गुन्ह्यांची कबुली दिली आहे. मलिक याच्यावर दिल्ली उच्च न्यायालयात बेकायदेशीर क्रियाकलाप प्रतिबंध कायदा (यूएपीए) यासह दहशतवादाशी संबंधित अनेक खटले दाखल आहेत. विशेष न्यायाधीश प्रवीण सिंह यांच्यासमोर या प्रकरणाची १९ मे रोजी अंतिम सुनावणी झाल्यानंतर आज या प्रकरणातील निकाल समोर आला. असे असतानाच आता या प्रकरणात आफ्रिदीने उडी घेतली. निकाल येण्याआधीच आफ्रिदीने काश्मीरमधील संघर्षावर भाष्य करताना भारताला लक्ष्य केले. मानवी हक्कांच्या निर्घृण उल्लंघनाविरुद्ध टीकात्मक आवाज शांत करण्याचे भारताचे सततचे प्रयत्न व्यर्थ आहेत. काश्मीरमध्ये स्वातंत्र्यासाठी सुरु असणारा संघर्ष यासिन मलिकविरोधातील खटल्यांमुळे थांबणार नाही. काश्मीरी नेत्यांविरोधात अशाप्रकारे अयोग्य पद्धतीने बेकायदेशीररित्या सुरु असणाऱ्या प्रकरणांची संयुक्त राष्ट्रांना दखल घ्यावी असे मी आवाहन करतो, असे ट्विट आफ्रिदीने केले आहे. आफ्रिदीने या ट्विटमध्ये पाकिस्तानात काश्मीरी संघर्षाचे प्रतिक असणारा झेंडा गच्चीवर फडकवतानाचा स्वतःचा फोटोही पोस्ट केला. आफ्रिदीच्या या ट्विटवरुन त्याच्यावर भारतीयांनी टीकेची झोड उठवली आहे. अशाप्रकारे न्यायालयीन वादांसंदर्भात आणि खास करुन भारत पाकिस्तान वादाबद्दल आफ्रिदेने भाष्य करण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही त्याने अशाप्रकारची वायफळ बडबड केल्याची उदाहरणे आहेत. दरम्यान, मलिकवर भारतीय दंड संहितेच्या कलम १६ (दहशतवाद कायदा), कलम १७ (दहशतवादासाठी निधी), कलम १८ (दहशतवादाचा कट रचणे) आणि कलम २० (दहशतवादी टोळीचा सदस्य) असे आरोप ठेवण्यात आले आहेत. यासोबतच त्याच्यावर UAPA, १२०बी (गुन्हेगारी कट) आणि १२४ ए (देशद्रोह) आरोप लावण्यात आले आहेत. हाफिद सईदने हुर्रियत कॉन्फरन्सच्या नेत्यांशी संगनमत करून दहशतवादी कारवाया करण्यासाठी हवाला आणि इतर माध्यमांद्वारे पैशांचा व्यवहार केला. त्यांनी हा पैसा खोऱ्यात अशांतता निर्माण करण्यासाठी, सुरक्षा दलांवर हल्ला करण्यासाठी, शाळा जाळण्यासाठी आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्यासाठी वापरला. याबाबत माहिती मिळाल्यानंतर एनआयएने भारतीय दंड संहितेच्या कलम १२०बी, १२१, १२१ए आणि यूएपीएच्या कलम १३, १६, १७, १८, २०, ३८, ३९ आणि ४० अंतर्गत गुन्हा दाखल केला होता.



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

## संजय राऊतांना चमचेगिरीची शिक्षा मिळणार

आधुनिक केसरी

**राज्यसभेच्या सहा जागांसाठी महाराष्ट्रात होणाऱ्या निवडणूकीत शिवसेनेचे विश्व प्रवक्ते आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हितचिंतक माजी खासदार संजय राऊत यांचा गेम होणार. भारतात जवळपास पंच्चावन्न राज्यसभेच्या जागांसाठी जून मध्ये निवडणूक होणार आहे. त्यात महाराष्ट्रातील सहा जागांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील आमदार 288 आहेत. जे या निवडणुकीत मतदार असतील. एका शिवसेना आमदाराचा मृत्यु झाला असल्याने 287 आमदार प्रत्यक्षात मतदान करतील.**

सध्याचे महाराष्ट्रातील पक्षीय बलाबल खालील प्रमाणे आहे. भाजप 105, शिवसेना 55, राष्ट्रवादी 54, काँग्रेस 44, अपक्ष 13, एमआयएम 2, बहूजन समाज 3, मार्क्सवादी 1, जनसुराज्य 1, क्रांतिकारी शेतकरी 1, मनसे 1, पिव्हिके 1, जनशक्ती 2, राष्ट्रीय समाज 1, सपा 2, स्वाभिमानी 1 एकुण 287 आमदार आहेत. सरळ सरळ विचार करता भाजप चे दोन आणि महा आघाडीतील तीनही पक्षाचा एक एक उमेदवार निश्चित निवडून येणार आहे. नंतर सेनेकडे 13, राष्ट्रवादीकडे 11, काँग्रेसकडे 2, भाजपकडे 21 मते शिल्लक राहणार असून इतर छोटे पक्ष आणि अपक्ष यांचे 29 मते राहतात. इतरांपैकी काही अपक्ष आणि छोटे पक्ष भाजप सोबत आहेत, तर काही आघाडी सोबत आहेत. परंतू एमआयएम, बहूजन, स्वाभिमानी, सपा, मनसे हे कोणाचे पारड्यात आपले वजन टाकतील हे स्पष्ट होत नाही.

आता शिवसेनेने दोन जागा लढवायचे जाहीर करून छत्रपती संभाजीराजे यांना अडचणीत टाकले आहे.

छत्रपती संभाजीराजे यांनी निवडणूक जाहीर होताच आपण अपक्ष लढणार असे जाहीर केले आहे. परंतू शिवसेनेने पक्षात प्रवेश करून सेनेचे उमेदवार म्हणून लढणार असाल तरच आम्ही पाठींबा देऊ असे सांगून पेच निर्माण केला. पण छत्रपती संभाजी राजे यांनी ठामपणे हा प्रस्ताव धुडकावून अपक्षच लढणार असे जाहीर केले. फारतर महा विकास आघाडी पुरस्कृत चालेल असे सांगितले, मग विश्व प्रवक्ते संजय राऊत यांनी कोल्हापूरच्या संजय पवार या सच्चा आणि कट्टर शिवसैनिकाचे नाव उमेदवार म्हणून जाहीर केले. हे नांव जाहीर करताना संजय पवार हे गेली 33 वर्षे अखंड सेनेशी एकनिष्ठ आहेत. आणि गेली 14 वर्षे कोल्हापूर जिल्हा प्रमुख आहेत हे ही आवर्जून आणि वारंवार सांगितले. ही एक जागा शिवसेनेची निश्चित निवडूण येईल कारण निष्ठेला उमेदवारी मिळाली आहे.

एक सच्चा मावळा आणि बाळासाहेबांचा कार्यकर्ता खासदार होणार आहे.

नेहमी प्रमाणे शरद पवार साहेबांनी तातडीने आधी छत्रपती संभाजी राजेंना आमची शिल्लक 11 मते आम्ही देऊ असे जाहीर केले. आणि नंतर उध्दव ठाकरेंनी आक्षेप घेऊन मागील उपकाराची जाणिव करून देताच नेहमीप्रमाणे पलटी मारली आणि आम्ही शिवसेने सोबत राहणार त्यांच्याच उमेदवाराला मते देऊ असे जाहीर केले. भाजपने एक पियुष गोयल आणि दुसरे कोल्हापूरचेच महाडीक या माजी खासदाराचे आणि धडपड्या मजबूत नेत्याचे नाव जाहीर केले. भाजपने राष्ट्रपती नामनिर्देशित सदस्य म्हणून संभाजीराजेंना संधी दिलेली आहे. आणि मराठा आरक्षणासाठी छत्रपती संभाजी राजे सतत प्रयत्नशील आहेत म्हणून अतिरिक्त मते त्यांना देण्याचे मूकपणे, कुठेही जाहीर वाच्यता न करता ठरविले होते.



पण शिवसेनेने दुसरा उमेदवार मैदानात उतरवल्या मुळे आता जर भाजपने ही आपला तिसरा उमेदवार आणायचे ठरवले तर निवडणूक अत्यंत चुरशीची होईल. घोडेबाजार भरेल, किंमत मोठी निघेल. तसेच सच्चे मराठा आमदार, आरक्षण मिळावे या बाजूचे आमदार, तसेच शिवसेनेने जनमताचा केलेला उपमर्द, सध्याच्या



महाराष्ट्रातील आघाडी सरकारचा भ्रष्ट आणि अनागोंदी कारभारामुळे नाराज असलेले आमदार, आपलेच पूढील निवडणूकीतील भवितव्य निश्चित करण्याचे प्रत्येकाची आपली आपली गणिते पाहता मतदानात उलथापालथ अपेक्षित आहे. ज्या ठामपणाने छत्रपती संभाजी राजे अपक्ष लढण्यावर ठाम आहेत त्या अर्थी उमेदवारी अर्जावर सह्या करणाऱ्या आवश्यक आमदारांची बेगमी त्यांचे कडे आहे.

आशा वेळी हे सरकार अस्तित्वात आणण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणारे, शरद पवार साहेबांचे गळी उतरवणारे आणि ईडीच्या कारवाईने भांबावलेले संजय राऊत धोक्यात येत आहेत. एकतर त्यांनी ईडीच्या विविध नेत्यांवरील कारवाई विरोधात आवाज उठवताना प्रत्येकवेळी मातोश्री ला अडचणीत आणले. प्रत्येक वेळी एका ठाकरे कुटूंबातील सदस्याला त्यांनी ईशाऱ्याईशाऱ्याने उघडे पाडले. गेली अडीच तीन वर्षे वैयक्तिक शरद पवार साहेबांचे प्रतिनिधी असल्या सारखे वक्तव्ये केली. आता संजय राऊतांचा उपयोग संपलाय साहेबांचे कार्यपध्दती नुसार तसेच उध्दव ठाकरें साहेब ही नाराज आहेतच.

बरे संजय राऊतांना जन सपोर्ट आहे असेही नाही. ते कायमच दरबारी राजकारण करत उखाळ्यापाखाळ्या करत, कटकारस्थाने आणि समज गैरसमज पसरवीत चर्चेत राहतात. त्यांचा आता ना पक्षाला उपयोग आहे ना साहेबांना. त्यामुळे संजय पवार सेनेचे, पियुष गोयल आणि महाडीक भाजपचे, एक काँग्रेस चा ठरेल तो आणि एक राष्ट्रवादी चा जाहीर होईल तो नक्की निवडून येणार. मग राहतात मैदानात सहाव्या जागेसाठी संजय राऊत, छत्रपती संभाजी राजे आणि भाजपने तिसरा उमेदवार दिलाच तर तो. यातुन एक निवडून येणार.

ठामपणे छत्रपती संभाजी राजे अपक्षच राहीले तर कदाचित भाजप, त्याचे मित्रपक्ष आणि सहयोगी अपक्ष छत्रपती संभाजी राजे यांनाच मतदान करतील. आणि मग संजय राऊत का छत्रपती संभाजी राजे यातून निवड करताना बहुतांश पक्ष छत्रपती संभाजी राजे यांचेच पारड्यात आपली मते टाकतील. मग येत्या तीन चार महीन्यात त्यांचे कडचे सामना चे संपादक पद काढून घेऊन त्यांना पूरते नागवे केले जाईल असे आत्ताचे चित्र दिसत आहे. अर्थात हा वरवरचा दिसणारा अंदाज आहे. प्रत्यक्षात काय होईल हे निश्चित पणे निवडणुकीत कोणते उमेदवार फायनली राहतील तेंव्हा स्पष्ट सांगता येईल.



सुनील शिरपुरे, यवतमाळ
संपर्क क्र. 7057185479

## बेरोजगार युवकांच्या स्वप्नांचे व्दार खुलणार

आधुनिक केसरी

**देशाचे उद्याचे भविष्य असणारे युवक नैराश्याच्या गर्ततेत ओढवले जात आहे. प्रत्येक युवकाचं एक स्वप्न असतं. त्या स्वप्नांचा पाठलाग करण्यासाठी तो दिवसरात्र एक करून मेहनत करत असतो. परंतु त्याच्या मेहनतीवर आपले उदासिन सरकार पाणी फेरतं. त्यामुळे तो बदललेल्या मानसिकतेमुळे नको ते कार्य करायला लागतो. याला जबाबदार सर्वस्वी आपली शासनप्रणालीच आहे. कारण मागील ६ वर्षापासून मोठ्या पदभरतीला पूर्णत: पूर्णविराम दिला आहे. यामुळे आपला प्रत्येक युवक बेरोजगारीच्या शृंखलेत जखडला आहे.**

सद्यस्थितीत शासनाच्या ३४ प्रमुख विभागांमध्ये २ लाखांवर पदे रिक्त आहेत. एकूण रिक्त पदांच्या ५० टक्के पदांच्या वेतनावरील खर्चाची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली असून पदभरतीवरील सर्व निर्बंधही वित्त विभागाने उठविले आहेत. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांपूर्वी किंवा निवडणूकीनंतर पहिल्या टप्प्यात ७० हजार ते ९० हजार पदांची मेगाभरती होऊ शकते. अशी माहिती राज्याच्या वित्त विभागातील वरिष्ठ सूत्रांनी दिली. राज्य सरकारी विभागांमध्ये मागील ६ वर्षात मोठी पदभरती झालेली नाही. कोरोना महामारीमुळे राज्य शासन सेवेतील नोकरभर्तीवर निर्बंध घालण्यात आले होते. परंतु सध्या कोरोना महामारीची परिस्थिती पूर्वपदावर आल्याने, शिवाय बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याने राज्य शासन सेवेत सुमारे ९० हजार जागांसाठी पदभरती करण्यात येणार आहे. आता, राज्य शासनाच्या विविध ३४ प्रमुख विभागांमध्ये २ लाखांपेक्षा अधिक पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांपैकी ५० टक्के पदावर भरती करण्याचा निर्णय राज्य शासनाकडून घेण्यात आला आहे. रिक्त पदांच्या ५० टक्के पदांचा विचार केला असता एकुण ९० हजार पदे होतात.

यासाठी राज्य शासनाच्या वित्त विभागाकडून मंजुरी देण्यात आलेली असल्याने मेगाभरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. शिवाय अनेक पदे २०१६ नंतर भरलेच नसल्याने कर्मचा-यांवर कामाचा मोठा ताण येत असल्याने राज्य शासनाने पदभरतीस मंजुरी दिली आहे.

यामध्ये गृह १८०००, जलसंपदा १५०००, कृषी व पशुसंवर्धन ५०००, महसुल/भूमीअभिलेख ७०००, शालेय शिक्षण ८०००, आदिवासी विकास विभाग ३०००, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ३०००, अन्न नागरी व ग्राहक विभाग २०००, सार्वजनिक आरोग्य विभाग ५०००, सार्वजनिक बांधकाम विभाग ३००० यापैकी गृह विभागाने ९००० हजार पोलिस भरतीसाठी मान्यता दिली आहे. त्याचबरोबर महसूल विभागाकडुन तलाठी पदाच्या १००० जागांसाठी भरती करण्यास मान्यता दिली आहे. त्याचबरोबर २०१९ मधील आरोग्य विभागातील भरती प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्याच्या अशा विभागांमध्ये रिक्त पदांची संख्या वाढली आहे. पदवी-पदव्युत्तर शिक्षण घेऊनही बरेच तरुण-तरुणी घरीच असून काहीजण कुटुंबाच्या आर्थिक अडचणींमुळे मिळेल ते काम करीत आहेत. सरकारी नोक-या नसल्याने अनेकजण विशेषतः मुली मधेच शिक्षण सोडून देत असल्याचीही वस्तुस्थिती आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात घोषित झालेली ६० हजार पदांची मेगाभरती अजूनही झालेली नाही. त्यामुळे तरुणांमध्ये नाराजीचा प्रचंड सूर आहे. या पार्श्वभूमीवर वित्त विभागाने पदभरतीवरील सर्व निर्बंध उठविले असून आता सर्व विभागांनी त्यांच्याकडील मंजूर व रिक्त पदांच्या आकृतीबंधास मान्यता घेऊन पदभरती सुरू करण्याची कार्यवाही सुरू केली आहे.

शासकीय कर्मचा-यांवर दरवर्षी १ लाख ३१ हजार कोटींचा तर ग्रँच्युटी व पेन्शनवर दरवर्षी जवळपास ५६ हजार कोटींचा खर्च होतो. दरम्यान, एकूण रिक्तपदांच्या ५० टक्के पदभरती होईल असे ग्राह्य धरून तेवढ्या रकमेची तरतूद केल्याचेही वित्त विभागांकडून सांगण्यात आले. आता, आकृतीबंधास अंतिम मान्यता मिळाल्यानंतर ही पदभरती अपेक्षित आहे. तर बेरोजगार युवकांनी स्वतःला या गर्ततेतून बाहेर काढावे. मला मान्य आहे, हे खूप अवघड आहे. तरी पण एक छोट्याशा आशेचा किरण घेऊन पूर्ववत पुन्हा जोमानिशी तयारीला लागावे. काय माहित कोणत्या क्षणाला व कोणत्या प्रयत्नाला आपल्यापैकी कुणाचं भाग्य उजळू शकेल. लागाल ना मग तयारीला...गुड! बेस्ट ऑफ लक..!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मायचं वागणं; लेकराला भोगणं!



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**आज कलियुग आहे. कलियुगात कोण कसा जगेल आणि कोण कसा वागेल ते सांगणे कठीण आहे. या कलिकाळात सख्खी आई आणि सख्खा बाप आपल्या मुलांचा सांभाळ करु शकत नाही. मग सावत्र बापाची का बरं आशा करावी. याबाबत एक प्रसंग सांगतो. मनिषा नावाची ती एक स्री. त्या स्रीचा पती काळाच्या ओघात मरण पावला. त्यानंतर तिला एकाकी वाटत होतं. तिला आपल्या पतीची आठवण येत होती. शेवटी ती आठवण विसरण्यासाठी तिनं फेसबुकवर एक मुलगा शोधला. हा मुलगा तिच्याशी गोड गोड बोलत होता. त्यानंतर त्याच्या गोड बोलण्यावर भाळून तिनं दुसरा विवाह केला. परंतु ती या दरम्यान हे विसरली की तिला एक बारा वर्षाची मुलगीही आहे.**

मनिषानं आपल्या पतीची आठवण विसरण्यासाठी नाही तर आपली कामुकता भागविण्यासाठी दुसरा विवाह केला. तोही त्याच्या गोड गोड बोलण्यावर भाळून. परंतु त्या माणसानं विवाह करतांना दुहेरी उद्देश ठेवला. पहिला म्हणजे ती. तिच्याकडून कामुकता पूर्ण करणे आणि दुसरा म्हणजे तिची मुलगी. हळूहळू त्या मुलीला जाळ्यात ओढणे. अशातच काही दिवस बरे गेले.
मनिषानं विवाह केला खरा. परंतु हा पती काही केल्या कामाला जात नव्हता. तो निकम्मा होता. त्यामुळं आपलं पोट भागविण्यासाठी व आपल्या मुलीचं पोट भागविण्यासाठी नाईलाजानं तिलाच कामावर जावं लागलं. अशातच तो मुलगा दिवसभर घरी राहायचा. त्यासोबतच तिची मुलगीही.
दिवसभर मनिषा कामावर जात असे व सायंकाळी घरी येवून स्वयंपाकही करीत असे. त्यातच तिची त्रेधातिरपीट उडत असे. परंतु आता उपाय नव्हता. ती त्याला सोडू शकत नव्हती. कारण एकीकडे तो गेल्यास किंवा त्याला सोडल्यास कामुकतेचा अभाव होणार होता. शिवाय मुलीलाही सांभाळणे गरजेचे होते. तिला दिवसभर कोण सांभाळेल. हा प्रश्न होता.
काही दिवस जाताच त्या मुलानं डाव साधला. कारण रात्रीचं ठीक होतं. परंतु दिवसाचं काय? तो दिवसभर बसून कंटाळवाणा व्हायचा. कारण हाताला कोणतंच काम नव्हतं. अशातच तो विचार करीत होता.
ते विचार... ते विचार कुविचारच होते. दिवसभर त्याच्या डोळ्यासमोर ती मुलगी असायची. मुलगी आज तरुण झाली होती. तिचं रुप निखरलं होतं. त्यातच त्याची भुरटी नजर तिच्यावर पडली व एक दिवस त्यानं डाव साधला. कारण तो त्या मुलीचा सख्खा बाप नव्हता.
तो अतिप्रसंग... मुलगी आपल्या आईला तो प्रसंग सांगतांना घाबरत होती. तिला वाटत होतं की ती आई आपलं खरं घेणार नाही. उलट आपल्यावरच रागवेल. याच विचारानं तिनं तो अत्याचार निमुटपणे सहन केला.
तो अतिप्रसंग त्या दिवशी तिनं निमुटपणे सहन केला. परंतु तो अतिप्रसंग तिनं आईला न सांगीतल्यानं आता मात्र त्या व्यक्तीसाठी रान मोकळं झालं. आता दिवसभर तिची आई मनिषा कामाला जायची व तो दिवसभर त्या मुलीशी तिची इच्छा नसतांना तिला ठार करायची धमकी देत तिच्यावर अत्याचार करीत असायचा. आपली कामुकता भागवायचा. असं त्याचं कृत्य बरेच दिवस चाललं.
एक दिवस त्यानं त्या मुलीचा सौदा करुन तिला परस्पर विकूनही टाकलं आणि सायंकाळी तिची आई घरी आल्यावर व तिला मुलगी घरी न दिसल्यावर त्याला विचारताच तो म्हणाला, "गेली असेल तोंड काळं करुन."
ते तरुणपण... त्यातच प्रेमाचे चक्कर... आईलाही वाटलं की तिची मुलगी कदाचित वयात आल्यानं कुण्या मुलासोबत पळून गेली असेल. परंतु सत्य काही वेगळंच होतं. अशातच दोनचार दिवस गेले.
दोनचार दिवस जाताच व विचार करताच मनिषाला वाटलं की आपण या प्रकरणाचा छडा लावावा. कदाचित कोणत्या मुलानं तिला फूस लावून नेलं असावं. कदाचित यातून आपली मुलगी तर मिळू शकेव. कारण जगण्याचा तिचा आधार तो पती नाही तर ती एकुलती एक तिची मुलगीच होती.
दोनचार दिवस निघून जाताच तिनं पोलिसस्टेशनला तिच्या मुलीच्या मिसींगची तक्रार केली. पोलिसांनी बराच शोधाशोध केला. परंतु ती मुलगी काही मिळाली नाही. शेवटी एका वेश्या अड्ड्यावर धाड टाकताच ती मुलगी मिळाली. ओळख म्हणून तिच्या आईला बोलावलं गेलं. तेव्हा तिच्या आईनं ओळखल्यावर पोलिसांनी सांगीतलं की आम्ही तिचं बयाण घेतो. त्यानंतर आम्ही तुमची मुलगी तुम्हाला परत देतो.
पोलिस बोलून गेले खरे. परंतू ते ऐकताच ती मुलगी म्हणाली, "थांबा साहेब, थोडं. मला माझ्या आईशी काहीतरी थोडं बोलायचं आहे." पोलिसांनी त्या मुलीचं ऐकलं. तिच्या विनंतीवरुन तिची हातखडी उघडली. तशी मुलगी आईजवळ गेली. त्यानंतर तिनं कोणत्याही क्षणाचा विचार न करता तिच्या थोबाडीत एक दोरात थापड भिरकावली. तो क्षण पोलिस स्टेशनचा प्रत्येक व्यक्ती पाहात होता. तसं तिला ताब्यात घेत पोलिस इनस्पेक्टरनं विचारलं की तिनं आपल्या आईला का मारलं!
पोलिसांनी तसा प्रश्न विचारताच ती मुलगी म्हणाली, "ही माझी आई नाही. ही माझी शत्रू आहे. आज मी या वेश्यालयात हिच्याचमुळे आहे."
पोलिसांनी त्यावर कारण विचारताच ती मुलगी पोपटासारखी तिच्यावर घडलेला अत्याचार सांगू लागली. त्यातच तिचा दुसरा विवाह व त्यानंतर तिच्या पतीचा अत्याचार तसेच त्याचं त्या मुलीला कुंटणखान्याला विकणं. साऱ्याच गोष्टी तिनं आईसमोर प्रत्यक्ष बयानार्थी सांगीतल्या.
शेवटी पोलिसांनी तिची स्वाक्षरी घेतली व तिला सोडून देत म्हटलं,
"आता तू तुझ्या आईकडं जावून राहू शकते."
पोलिसांनी तसं म्हणताच ती मुलगी हात जोडून म्हणाली,
"साहेब, माझी हात जोडून एक विनंती आहे तुमास्नी. जरा ऐकून घ्याल काय?"
साहेब आश्चर्यचकीत झाले. तसे म्हणाले,
"बोल लवकर, काय बोलायचं ते?"
तशी मुलगी बोलायला लागली.
"साहेब, वाटल्यास आपण माझा जीव घ्या. वाटल्यास मला कुंटणखाण्यात पाठवा वा वाटल्यास कुठेही. परंतू मला माझ्या आईजवळ पाठवू नका. काय माहित की उद्या या आईमुळंच मी जीवंत राहू शकते की नाही."
"अर्थात?"
"साहेब, काल या माझ्या सख्या आईमुळं मी आज कुंटण खाण्यात सापडले. जीवंत होते म्हणून. ते कुंटणखाणं जरी माझ्या देहाचा व्यापार करीत असलं तरी त्या कुंटणखाण्यानं माझा जीव तर वाचवला. परंतू काय विश्वास ठेवू मी की उद्या हीच माझी आई, तिच्या दुस-या पतीच्या नादाला लागून माझा जीव घेणार नाही! म्हणेल की तू माझी बदनामी केली. साहेब आपणास विनंती आहे की आपण मला कृपा करुन माझ्या आईजवळ पाठवू नका. त्यापेक्षा मला कुंटणखाण्यातच जायला आवडेल."
मुलगी बोलून गेली खरी. परंतू सर्वांना आश्चर्याचा धक्का देवून गेली. ती अजूनही बालिश व्हायचीच होती. परंतू तिच्या अनुभवानं ती मोठ्या माणसालाही लाजवेल असंच बोलून गेली. पोलिसांनी मुलीचं ऐकलं व तिला तिच्या आईकडं न पाठवता तिला अनाथालयात पाठवलं. अनाथालयानं तिची जबाबदारी स्विकारत तिला लहानाचं मोठं केलं व जेव्हा ती बालिश झाली. तेव्हा एका सुसंस्कृत कुटूंबात तिचा विवाह करुन दिला. आज ती मुलगी सुखी झाली होती. चांगलं घरदार व घराणंही तिला मिळालं होतं. मात्र ती जन्मदात्री आई. आता तिच्याजवळ अश्रू शिवाय काहीच उरलं नव्हतं. ती दिवसेंदिवस पश्चातापाचे अश्रू रडत होती.
तो पतीही आज तुरुंगात होता. तिच्या मुलीनं ज्यावेळी बयाण दिला. त्याचवेळी कारवाई करीत पोलिसांनी त्याला उचलून नेवून तुरुंगात टाकले होते.
मनिषाचा भ्रम निघाला होता. आजही तिला पती म्हणून फेसबुकवर कित्येक पती मिळत होते. परंतू ती त्याकडं आता लक्ष देत नव्हती. कारण ती फसली होती नव्हे तर चांगलीच फसली होती.
आज मनिषानं व्हाट्सअप व फेसबुकही बंद केलं होतं नव्हे तर जगातील प्रत्येक पुरुषांबद्दल तिच्या मनात तिटकारा निर्माण झाला होता.
ही वासना... ही वासना वास्तविकता नाही आणि वासना पुर्ती नाही झाली तर व्यक्ती मरतही नाही. क्षणापुरती वासनेची आठवण येते. जीव अगदी कासावीसही होतो हेही तेवढंच खरं. परंतू ती एक वेळ असते. ती वेळ निघून जाताच वासनाही मिटते. त्यानंतर काही दिवसांनी तशी सवय होवून जाते. मग माणसं आवडत नाहीत. फेसबुक, व्हाटेसअप, इंस्टाग्राम आणि मेसेंजर ही मिडीयावरील अश्लीलता वाढविणारी माध्यमं. हळूच मेसेंजरवरुन व्हिडीओ काल येतो. मग एकदा चेहरा पाहिला की बोलणं सुरु होतं. त्यातच अगदी अश्लीलता प्रदान करणारे व कामुकता निर्माण करणारे मेसेज सुरु होतात. ते मेसेज असे असतात की चांगली चांगली माणसं वाम मार्गाला लागतात. खरं तर या ऋतूचक्रात सारेच माणसं बिघडत असतात. त्यात महिलाही अपवाद नाहीत. परंतू असं जरी बिघडायचं असेल आणि आपल्या जन्मास घातलेल्या मुलांची काळजी आपल्याला घेता येत नसेल तर मुलांना जन्माला तरी का घालावं? त्यांची जीवनी तरी मायबापानं बरबाद का करावी. यात मनिषाचं एकटंच उदाहरण नाही. जगात अशा अनेक मनिषा आहेत की ज्या आपल्या लेकराची पर्वा न करता वा काळजी न करता एक पती जीवंत असतांना दुस-या परपुरुषांसोबत संबंध ठेवतात. तसेच असे अनेक पुरुष आहेत की जे एक घरी पत्नी असतांना बाहेर परस्त्रीशी संबंध ठेवतात.
मनिषाचा तर पती मरण पावला होता.
यात मनिषाचं शेवटी पती बनवितांना हेच चुकलं की ती स्वतः कामाला निघाली. तो पती जर काम करीत नव्हता तर तिनं त्याला सोडून द्यायला हवं होतं. त्याला मुलीच्या देखभालीसाठी व आपली कामुकता दुर करण्यासाठी जागेवर पोसायची गरज नव्हती. त्याला काम नसल्यामुळं त्यानं तसं पाऊल उचलतं असं कदाचित म्हणता येवू शकेल. परंतू हेही सत्य नाही. खरं तर दुसरे परपुरुष हे असा विवाह करतांना जर मुलगी असेल तर तिच्यावर वासनेची नजर टाकूनच अशा स्त्रीशी विवाह करीत असतात. हे तेवढंच खरं आहे. याला काही अपवादही नक्कीच आहेत.
महत्वाचं म्हणजे स्त्रीयांनी दुसरा विवाहच करु नये. जर कामुकता भागवायची असेल तर बाहेर एखादा लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये पार्टनर ठेवलेला बरा. त्याला घरापर्यंत आणू नये. आपल्या मुलांना त्याचं तोंडही दाखवू नये. सगळं गुपचूपपणे करावं. अगदी समाजालाही माहित होणार नाही असं. खास करुन मुली असणा-या पालकांनी. जेणेकरुन कुणाचीही मुलगी कुंटणखाण्यात जबरदस्तीनं जाणार नाही वा कोणत्याही मुलीला आईवर हात उचलायची पाळी येणार नाही हे तेवढंच खरं आहे.



# प्रा. डॉ. उमराव कावळे : अधुरी एक कहाणी...

आधुनिक केसरी

**डॉ. उमराव विठ्ठलराव कावळे हे वसमतच्या श्री योगानंद स्वामी महाविद्यालयात समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक होते. २६ मे २०२१ रोजी अथक प्रयत्न करूनही ते कोरोनाने सर्वांना सोडून गेले. किरकोळ शरीरयष्टी, कमी उंची, काळा-सावळा वर्ण, सरळ - दरदरीत नाक, संवादाला ग्रामीण बोलीचा टच आणि व्यवहारात, स्वभावात प्रामाणिकपणा यामुळे या व्यक्तीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. उमराव हे वसमत तालुक्यातील नहादचे. अल्पभूधारक कुटुंबातून आलेले असल्याने दारिद्र्याचा गडद अंधार त्यांच्या सभोवताली होता.**

त्यांची २००२ पासून महाविद्यालयातील रीतसर सेवेला सुरुवात झाली. लग्नानंतर पत्नीला गावाकडेच ठेवावे लागले. विनाअनुदान संस्कृतीत काम करताना नावामागे 'प्राध्यापक' पद चिकटते; परंतु वास्तव जगण्यात प्राध्यापक असल्याच्या खाणाखुणा कुठेच दिसत नाहीत.मन मारून तडजोडी करत जगावे लागते. या दृष्टीने भास्कर चंदनशिव यांची 'अन हाती खुरपं आलं' ही कथा आणि नागनाथ पाटील यांची कोंडणातलं जिणं'ही कादंबरी विनाअनुदान संस्कृतीच्या वेदना मुखर करणारी आहे.या कादंबरीतील नायक रामा पवार त्याकाळी अनेक ठिकाणी,आपल्यात सतत जाणवत राहयचा. पुढे त्यांनी वसमतला एका खोलीत आपला संसार थाटला. गावाकडून राशन पाणी आणून प्रपंच चालवावा लागे. साधारणपणे सुरुवातीच्या काळात आम्हा सर्वांची हीच अवस्था होती.
काही वर्षानंतर महाविद्यालय अनुदानावर आले बऱ्याच संघर्षानंतर सुखाचे दिवस आले. कळ्याफुलांनी झाड डवरून यावे तसे. उमराव यांनी वसमतला तीन खोल्यांचे 'विठ्ठला' नावाचे घर बांधले.'रिन काढून सण साजरा करण्यापेक्षा अंथरूण पाहून पाय पसरावे' या उक्तीप्रमाणे ते आयुष्यभर जगत आले. शिस्त, वक्तशीरपणा आणि प्रामाणिकता हे गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होते. महाविद्यालयात अगदी वेळेवर येणे, वेळेवर घरी जाणे, विद्यार्थ्यांचे समाधान ही शिस्त त्यांनी शेवटपर्यंत मोडली नाही. तसेच उमराव यांना गाव, मातीचा लळा होता. अनेक सण उत्सवात ते गावाकडे रमायचे. आपल्या कुटुंबासोबतच शेतीमातीला जीव लावणारा हा माणूस होता. उमराव यांचे मोठे बंधू श्री. गंगाधरदादा यांच्या मुला-मुलींना स्वतःकडे ठेवून शिकविले, उच्चविद्याविभूषित केले. शिक्षणानेच माणसाच्या जीवनात क्रांती होते. शिक्षणच माणसाच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन करते, याची पक्की जाणीव त्यांना होती. गंगाधरदादांच्या तिन्ही मुलींच्या लग्नात उमराव वधूपिताच्या भूमिकेत दिसले.हे विवाहसोहळे नहादला झाले. त्याचे साक्षीदार डॉ. काशीनाथ चव्हाण, डॉ.किशन बाभुळगावकर, डॉ. ज्ञानेश्वर गाडे यांच्यासह आम्ही सर्व जण होतो.
डॉ.उमराव विनाअनुदानाच्या रखरखत्या उन्हातून नुकतेच अनुदानाच्या छायेत आले होते. मुलगी - जान्हवी,मुलगा - कार्तिक, पुतणे, पुतण्या,



भाचे, नातेवाईक, मित्रपरिवार अशा गोतावळ्यात ते रमले होते.माणसांचे सुखदुःख वाटून घेण्यात मनस्वी आनंद मानणारा हा प्राध्यापक होता. आपल्या सहवासातील प्रत्येकाला योग्य मार्गदर्शन आणि सन्मार्ग दाखविणारा समाजशिक्षक होता. त्यामुळे 'आगेची काडी होण्यापेक्षा मायेची सावली देणारी भव्य माडी व्हावी' या वृत्तीने ते जगत राहिले, हे आम्ही जवळून अनुभवले आहे. गाव, समाज, गणगोतातील अनेक जणांचे वितुष्ट त्यांनी अत्यंत कौशल्याने संपविले. समाजशास्त्राच्या अध्यापनाचासोबतच सामाजिक बांधिलकीच्या कळवळ्याने ओथंबलेले ते व्यक्तिमत्त्व होते.
तुमच्या अकाली जाण्याने कुटुंबाचेच नव्हे तर तुमच्या सहवासातील माणसांचे, समाजाचे फार मोठे नुकसान झाले आहे.कारण तुमच्या जगण्याचा अवकाश व्यापक होता. इतरांचे जगणे समृद्ध करणारी विचारधारा फार थोड्या लोकांकडे असते, ती तुमच्यात होती म्हणून तुमचे जाणे मनाला चटका लावून गेले आहे. तुमच्या जाण्याची सल काळजाच्या गाभाऱ्यात रुतून बसली आहे.

प्रा. डॉ. कमलाकर चव्हाण
वसमत, मो. ९४२१३८१३५०

डॉ. उमराव कावळे यांना चांगले स्थैर्य लाभत असताना त्यांना किडणीच्या आजाराने गाठले. एका अर्थाने ते संघर्षमूर्ती ठरले.संघर्षाने त्यांची पाठ कधीच सोडली नाही. २०१४ मध्ये किडणी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी झाली. किडणी देण्याचा प्रसंगही अंगावर शहारे उमटविणारा आहे. किडणी देण्यासाठी अनेक दाते तयार होते; परंतु गंगाधरदादा यांनी स्पष्ट सांगितले की, 'मह्या भावाला महीच किडनी देणार...' अनेक उलटसुलट चर्चा सुरू होत्या. तरीही गंगाधरदादांचा दृढनिश्चय हिमालयासारखा होता. आईला मूल स्तनपान करते त्यावेळी बाळाला दूध पिण्याची इच्छा असते त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने दूध पाजण्याची तीव्र इच्छा आईला असते. यामध्ये आपुलकी,जिव्हाळा आणि स्निग्धतेचे नाते असते. या घटनेने ही भावाची जोडी राम-लक्ष्मण म्हणून संबोधली जाऊ लागली. 'सख्खे भाऊ पक्के वैरी' या समाजसंस्कृतीतील म्हणीला यांना नातेबंधाने छेद बसला. खरे तर 'सख्खे भाऊ पक्के भाऊ' ही काळाची गरज आहे, यामध्ये खूप मोठी शक्ती असून तिला ओळखणे गरजेचे आहे. गंगाधरदादांची किडणी अत्यंत एकरुप झाली. पुढे डॉ.उमराव यांना कोणताही त्रास झाला नाही. त्यांनी काटेकोरपणे पथ्ये पाळली. किडणी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेनंतर ते शेवटपर्यंत कोणत्याही समारंभात जेवल्याचे, पाणी पिल्याचे मला आठवत नाही.

(उर्वरित उद्याच्या अंकात)

# जातीनिहाय जनगणना केल्याशिवाय गत्यंतर नाही : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** इथे कुणी फुकट काही मागत नाही. जो न्यायाचा अधिकार आहे, तो मिळायला हवा यासाठी जातीनिहाय जनगणना केल्याशिवाय गत्यंतर नाही अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी ओबीसी अधिवेशनात आज मांडली. राष्ट्रवादीच्या ओबीसी सेलच्यावतीने राज्यस्तरीय अधिवेशन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आज पार पडले. राज्यघटनेने एससी, एसटी समाजाला ज्या सवलती देऊ केल्या ज्याचा त्यांना फायदा झाला. तशा सवलतींचा आधारदेखील ओबीसी समाजाला देण्याची गरज आहे. जोपर्यंत एखादा समाज सन्मानाने उभा राहत नाही, तोपर्यंत सवलती देण्याची गरज आहे. हे करण्यासाठी ओबीसींची नेमकी लोकसंख्या किती? असा प्रश्न काही लोक उपस्थित करतात. खरंच या समाजाची लोकसंख्या मोठी आहे का? हे तपासण्याची गरज आहे. त्यामुळे ओबीसींची जातीनिहाय जनगणना करायला हवी, असा जो ठराव आजच्या अधिवेशनात करण्यात आला आहे, तो अतिशय योग्य आहे. एकदाची जातीनिहाय जनगणना करुनच टाका म्हणजे या देशाला नेमकी संख्या कळेल. मग त्या संख्येप्रमाणे न्यायाची वाटणी करा असेही स्पष्ट मत शरद पवार यांनी व्यक्त केले.

आज भाजपचे नेते, माजी मुख्यमंत्री सांगतात की, महाविकास आघाडीने धोका दिला. पण पाच वर्ष तुमच्या हातात सत्ता असताना आणि केंद्रात असताना तुम्ही झोपला होता का? असा प्रश्न करतानाच तुम्हाला आमच्यावर टीका करण्याचा अधिकार नाही अशा स्पष्ट शरद पवार यांनी शब्दात सुनावले. आज भाजपचे लोक काहीही बोलत असले तरी त्यांच्या मनातली मळमळ स्पष्ट दिसत आहे. या लोकांकडून ओबीसींना न्याय मिळेल याची कोणतीही शक्यता नाही असेही शरद पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ओबीसी सेलच्यावतीने आज राज्यस्तरीय ओबीसी अधिवेशन घेऊन विविध ठराव करण्यात आले. या ठरावाच्या माध्यमातून प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी राज्यकर्त्यांना एक रस्ता दाखविण्याची भूमिका घेतल्याबद्दल शरद पवार यांनी ओबीसी सेलचे कौतुक केले.

महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या अधिकारांचा वापर करुन समाजाला न्याय दिला हेही शरद पवार यांनी आवर्जून सांगितले. समाजातली असमानता काढून टाकण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी मागासवर्गीयांना ५० टक्के आरक्षण लागू केले. हा निर्णय घेत असताना ज्यांनी विरोध केला, त्यांच्या विरोधाला त्यांनी जुमानले नाही. सांगायचे तात्पर्य असे की, आजही आपण हेच प्रश्न मांडत आहोत. कारण स्वातंत्र्याला इतके वर्ष होऊनही आपण समान पातळी गाठण्याचे उद्दिष्ट होते, ज्याची वाच्यता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत केलेली होती. ते उद्दिष्ट अजूनही गाठले नाही. यासाठी समाजात जी कमतरता आहे ती घालवली पाहिजे असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले. ओबीसींचा प्रश्न बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी काल पुन्हा उपस्थित केला. ते भाजपचे सहयोगी आहेत, तरीही त्यांनी जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा मांडला. पण केंद्रातले हे सरकार असेपर्यंत हे होईल, असे मला वाटत नाही. कारण ज्यांच्या हातात देशाची सत्ता आहे, त्यांची मानसिकताच वेगळी आहे अशी जोरदार टीकाही शरद पवार यांनी केली.

भैय्याजी जोशी नामक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहकार्यवाहकाने याप्रकारची जनगणना अजिबात मंजूर नाही. अशी जनगणना झाल्यास समाजात चुकीचे वातावरण निर्माण होईल असे म्हटले आहे. यावर त्यांना एक प्रश्न आहे की, सत्य समोर आले तर चुकीचे वातावरण कसे होईल? जातींच्या जनगणनेमुळे जर समाजात अस्वस्थता येत असेल तर त्यावर जे काही करावे लागणार असेल ते करण्याची राष्ट्रवादीची तयारी आहे. त्याशिवाय आम्हाला न्याय मिळणार नाही. यासाठी जागृतीचे काम राष्ट्रवादी काँग्रेस करेल अशी ठाम भूमिका शरद पवार यांनी स्पष्ट केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा राज्य सरकारचा घटक म्हणून आगामी स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणुकीत ओबीसी आरक्षणाचा विषय मार्गी लावूनच निवडणुकांना सामोरे जाईल. ओबीसींना त्यांचे प्रतिनिधीत्व देऊनच सत्तेचा कारभार चालवेल. तसेच हे फक्त महाराष्ट्रापुरते करुन चालणार नाही तर संबंध देशात ओबीसींना न्याय देण्याची भूमिका आपल्याला घ्यावी लागेल अशी स्पष्ट भूमिका शरद पवार यांनी यावेळी मांडली.

**ओबीसींचे आरक्षण ही राजकीय लढाई नाही तर सामाजिक लढाई आहे : छगन भुजबळ**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ओबीसी सेलने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय ओबीसी अधिवेशनात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते व अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी आपल्या भाषणात ओबीसींच्या आरक्षणाचा संपूर्ण इतिहास मांडून विरोधकांच्या आरोपांची चांगलीच चिरफाड केली. महात्मा फुले ते राजर्षी शाहू महाराज, कालेलकर आयोग ते मंडल आयोग आणि २०११ सालची जातिनिहाय जनगणना ते २०१७ साली फडणवीस मुख्यमंत्री असताना सुप्रीम कोर्टात भाजपच्या लोकांनी ट्रिपल टेस्टसाठी धरलेला आग्रह या सर्व महत्त्वाच्या घटनांचा मागोवा आणि त्याचे मुद्देसूद विश्लेषण छगन भुजबळ यांनी आपल्या भाषणात केले.

भाषणाच्या सुरुवातीलाच छगन भुजबळ यांनी राज्यातील विरोधी पक्षातील नेत्यांची आरोग्य तपासणी केली पाहिजे. त्यांच्या शरीरातले सोडीयम वगैरे कमी झाल्यामुळे बहुतेक स्मरणशक्ती कमजोर झाली असेल अशी जोरदार टीका केली. शिवाय ओबीसी आरक्षणासाठीचा इतिहास काय आहे? त्यासाठी कुणी लढा दिला? याची जाणीव विरोधकांनी ठेवायला हवी. इतिहास विसरता कामा नये. इतिहास जाणून घेतला तरच सर्वांना एकत्र येऊन काम करता येईल. राज्यात आरक्षणासाठी आक्रोश न करता तोच आक्रोश भाजपच्या लोकांनी दिल्लीत जाऊन केला तर आरक्षण मिळणे सोपे जाईल असा जोरदार टोलाही छगन भुजबळ यांनी लगावला.

**कोर्टाच्या चौकटीत बसवून आरक्षणासहीत निवडणूका घेण्यासाठी आपले प्रयत्न : जयंत पाटील**

ओबीसी आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका होऊ नयेत, ही राष्ट्रवादी काँग्रेसची आग्रही मागणी आजही आहे. सुप्रीम कोर्टाने कोणताही निकाल दिला असला तरी कोर्टाच्या चौकटीत बसवून आरक्षणासहीत निवडणूका घेण्यासाठी आपले प्रयत्न सुरु आहेत, अशी ठाम भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी राज्यस्तरीय ओबीसी अधिवेशनात आज मांडली. दरम्यान ओबीसी समाजाचे अनेक प्रश्न आहेत, त्यांची सोडवणूक करत असताना ओबीसी समाजाला मदत करण्याचे काम आपल्याला करायचे आहे. ओबीसी आरक्षण मिळण्यासाठी न्यायालयीन लढाईवर आपण लक्ष केंद्रीत केले असल्याचे देखील जयंत पाटील यांनी सांगितले.

**ओबीसी समाजाचा प्रश्न जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत हा विषय लावून धरू : खा.सुप्रिया सुळे**

लोकसभेत आपल्या पक्षाचे खासदार सुनील तटकरे, अमोल कोल्हे व मी पूर्णपणे तत्पर आहोत. ओबीसी समाजाचा प्रश्न जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत हा विषय लावून धरू असे आश्वासन खासदार सुप्रियाताई सुळे यांनी दिले. ओबीसी आरक्षणाची घटना दुरुस्ती १९९४ साली पवारसाहेब मुख्यमंत्री असताना झाली. यानंतर कर्नाटकचे कृष्णमुर्ती यांनी केस केली त्याचा निकाल लागला व इम्पिरीकल डाटा गोळा करण्याचा निर्णय पहिल्यांदा झाला. तसेच इम्पिरीकल डाटा संदर्भात मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र राज्य एकत्र लढण्याचा निर्णय दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केलेल्या चर्चेत झाला. मात्र मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री दिल्लीला गेल्यानंतर काय बदल झाले आणि मध्यप्रदेशला न्याय देऊन पुन्हा फसवणूक झाली व महाराष्ट्रावर अन्याय झाला. यातही मध्यप्रदेशला दिलेली ऑर्डर फायनल नाही असेही सुप्रियाताई सुळे यांनी सांगितले. महाराष्ट्रातील काही नेते व माजी मुख्यमंत्री शाप शाप अशी भाषा करतात पण आपले राज्य हे पुरोगामी विचाराचे आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी अंधश्रद्धेतून श्रद्धेत आणले त्यांच्याच बद्दल शापाची भाषा वापरतात. मूळ विषयातून बगल देऊन वेगळी भूमिका मांडण्याचे काम होत आहे. हे पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणाचे काम होत आहे असेही सुप्रियाताई सुळे म्हणाल्या.

**सर्व जातींना आरक्षण देण्याचा ठराव करा व मग आमच्यावर बोला : धनंजय मुंडे**

ओबीसींच्या राजकीय आरक्षणाबाबत सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यानंतर विरोधकांकडून महाविकास आघाडीवर खूप टीका करण्यात आली. आम्ही आरक्षणाच्या विरोधात असल्याचे चित्र निर्माण केले गेले. आज आम्ही या राज्यस्तरीय अधिवेशनात ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणूका नको, या ठरावाचे अभिनंदन सर्वांनी केले. तसाच ठराव रेशीम बागेमध्ये संघाच्या कार्यकारिणीमध्ये या देशातील सर्व जातींना आरक्षण दिले पाहिजे, असा ठराव करा आणि मग आमच्यावर बोला, असे थेट आव्हान सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले

विरोधक आज उठतात आणि आमच्यावर बिनबुडाचे आरोप करतात. मध्यप्रदेशच्या निकालाचे दाखले विरोधक देतात. मग सत्ता असताना भाजपने मागच्या पाच वर्षात मध्यप्रदेशसारखा निर्णय का घेतला नाही? असा सवाल देखील धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला. भाजप सरकारच्या काळातच ओबीसी आरक्षणाच्या विरोधात केस दाखल झाली, फडणवीस मुख्यमंत्री असतानाच सुप्रीम कोर्टात साक्षीपुरावे सादर झाले आणि फक्त निकाल आमच्या काळात लागला. मग आमच्यावर कसे काय आरोप करतात? भाजपने जनाची नाही तर मनाची तरी लाज बाळगावी, अशी खरमरीत टीकाही धनंजय मुंडे यांनी केली.

# बोरवाडी ग्रामपंचायतीवर महिलांचा घागर मोर्चा

## सरपंच आणि ग्रामसेवक संगनमताने ठेवत आहेत बोरवाडीला पाण्यापासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** पांडुरणा परिसरातील सर्वात मोठी आदिवासी लोकसंख्या असलेली ग्रामपंचायत म्हणून बोरवाडी ग्रामपंचायतीची ओळख आहे आणि हीच ग्रामपंचायत सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकलेली दिसत आहे. वार्ड क्रमांक दोन मध्ये विरोधी गटाचे ग्रामपंचायत सदस्य असल्यामुळे सरपंच आणि ग्रामसेवक जाणीवपूर्वक त्या वार्डातील महिलांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवण्याचे म्हणजे महापाप करीत आहेत.

संबंधित वार्डातील ग्रामपंचायत सदस्य व प्रतिष्ठित, नागरिक व महिलांनी वारंवार विनंती करूनही पाणी असलेल्या बोरवेलमध्ये मोटार टाकण्यास टाळाटाळ केलेली आहे. गेली पंधरा दिवसापासून सदरील वार्ड पिण्याच्या पाण्यापासून वंचित असल्याने लहान मुलांसह महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. २४ मार्च च्या ग्रामसभेत पाणी पुरवठ्यासाठी दोन लक्ष सात हजार रुपये उपलब्ध असल्याचे सरपंच यांनी सांगितले होते परंतु आज खात्यात पैसे नसल्याचे कारण सांगून गावाला पाण्यापासून वंचित ठेवण्याचे काम येथील लोकप्रतिनिधी व ग्रामसेवक सांगणामताने करीत आहेत. वारंवार सांगूनही ऐकत नसल्याने आज दि.२५ मे रोजी वार्ड क्रमांक २ व परिसरातील शेकडो महिलांनी ग्रामपंचायतीवर घागर मोर्चा काढून आक्रोश व्यक्त केला. तरीसुद्धा ग्रामसेवक व सरपंच यांनी दाद न दिल्याने महिलांनी तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत.

> **१० मे पासून आज २५ मे पर्यंत वार्ड क्रमांक दोन मध्ये मोटार विना पाणी मिळत नाही आणि सरपंच यांना सांगूनही कसलाही परिणाम झाला नाही तर ग्रामसेवक यांनी या कालावधीत एकही भेट गावाला दिली नाही.**
>
> **कोंडीबा झाडे, ग्रामस्थ, बोरवाडी**

> **आज आम्ही नांदेड येथे बदल्या यासंदर्भात आहोत. उद्या बोरवाडी गावात येऊन पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडणार आहोत.**
>
> **शेटवाड, विस्ताराधिकारी, पं.स.भोकर**

> **बोरवाडी गावांमध्ये प्रचंड प्रमाणात बोगस कामे होत असून वरिष्ठ कार्यालयास तक्रारही दिलेल्या आहेत तरी पण अद्याप कोणतीही कार्यवाही गटविकास अधिकारी यांनी केलेली नाही.**
>
> **भागीरथीबाई वानोळे, ग्रा.पं.सदस्य, बोरवाडी**
> **महादू वागतकर, ग्रा.पं.सदस्य, बोरवाडी**





# पाण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा एल्गार

## बापु नगर ते मनपा टाऊन हॉल कार्यालय पदयात्रा

**औरंगाबाद :** बापु नगर व पैठणगेट येथील ढोलवाली गल्लीतील पाणी प्रश्न तातडीने सोडवा या मागणीसाठी बापूनगर ते मनपा टाऊन हॉल कार्यालय पदयात्रा काढण्यात आली. मागण्या मंजूर न झाल्यास वारंवार पदयात्रा काढुन आंदोलन करुत असा इशाराच भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या खोकडपुरा शाखेने दिला आहे. आयुक्त, उपायुक्त अभियंते अनुपस्थित होते. याबाबतचे निवेदन उशिरा पाणी प्रश्नाचा संबंध नसलेल्या मनपा उपायुक्त नंदा गायकवाड यांनी स्विकारले. यावेळेस मोठ्या संख्येत महीला रिकामा हंडा आणि विळा ओम्बीचा लाल झेंडा घेऊन उपस्थित होत्या.

याबाबत असे की, पाणी प्रश्नावर महानगरपालीका अजुनही गंभीर नसल्याचा आज पुन्हा प्रत्यय आला आयुक्त व उपायुक्तांच्या खुर्च्या रिकाम्या होत्या. उशिराने पाणी प्रश्नाचा संबंध नसलेल्या उपायुक्त मनपा उपायुक्त नंदा गायकवाड यांनी निवेदन स्विकारले. गेल्या अनेक वर्षांपासुन बापूनगर वार्ड क्र. ५४ ची शेवटची गल्ली व पैठणगेट वार्ड क्र. ५५ ची ढोलवाली गल्लीतील नळांना पाणी नाही. नळ कोरडे असतात, त्यातून फक्त हवा येते. काही ठिकाणी पाणी येते तर ते दुषित, ड्रेनेजचा वास येणारे घाण पाणी येते. त्यामुळे या परिसरातील लोक आजारी पडतात. बापूनगरच्या सर्व गल्लीत एकाच वेळी पाणी येत नाही. मधल्या गल्लीला कमी दाबाने पाणी येते तर शेवटच्या गल्लीला अजिबात पाणी येत नाही. पैठणगेट येथील ढोलवाली गल्लीत आपल्या अभियंत्यांनी अनेक ठिकाणी खोदून पाहीलं परंतू वॉल सापडत नाही, फॉल्ट सापडत नाही, मनपाकडे पाईपलाईन व वॉल्व्हचा नकाशा देखील नसावा, ही अत्यंत संतापजनक बाब आहे. नकाशे नसल्यामुळे अभियंते रस्ता खोदून पाहतात व खोदल्यानंतर वॉल्व्ह व पाईपलाईन सापडत नाही. त्यामुळे सरकारी पैसा वाया जातो. वेळ वाया जातो आणि पाणी पूरवठ्याच्या कामाला अक्षम्य दिरंगाई होते. पाणीपुरवठा करणारे कर्मचारी प्रेशर नाही म्हणून वरिष्ठांकडे बोट दाखवतात. वरिष्ठ अधिकारी सांगतो, बोलतो, करतो असे बोलत राहातात. पाणीपुरवठ्याची व्यवस्था पारदर्शक नाही, ही आजारी व्यवस्था आहे. त्यास बदलण्याची गरज आहे. असे निवेदनात नमुद आहे.

बापूनगर व पैठणगेट, ढोलवाली गल्ली येथील नळ पाईपलाईन व वॉल्व्हचा तातडीने नकाशा तयार करा, अनावश्यक वॉल्व्ह काढून टाका, गरज पडल्यास नवीन पाईपलाईन टाका, प्रेशर वाठवा. सर्व गल्ल्यांना एकाच वेळी, सारख्या दाबाने वीज असेल अशा वेळी किमान सलग ३ तास पाणीपुरवठा करा. बापूनगर भागात नवीन ड्रेनेज लाईन टाका, चोकअप काढण्याचे काम अत्यावश्यक असल्याने अधिक जेटींग मशिन वाहन खरेदी करा. त्या जेटींग बापूनगर सारख्या झोपडपट्यांना प्राधान्याने पाठवा.

त्याच बरोबर बापूनगर भागातील ड्रेनेज लाईन ही ४०-५० वर्ष जूनी झाली असल्याने ती वारंवार चोकअप होते, सफाई कामगार जेटींग मशिनशिवाय होणार नाही, असे म्हणतात तर जेटींग मशिन महीना-पंधरा दिवस येत नाही. त्यामूळे प्रातःविधीसाठी पाहुण्यांकडे जाण्याची वेळ नागरिकांवर येते. या मागण्यांचे निवेदन भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या खोकडपुरा शाखेतर्फे पाणी प्रश्नाचा संबंध नसलेल्या मनपा उपायुक्त नंदा गायकवाड यांना देण्यात आले.

८ दिवसात मागण्या मंजूर न झाल्यास मनपा टाऊन हॉल कार्यालयापर्यंत वारंवार पदयात्रा काढण्यात येईल असा इशाराही भाकपने दिला आहे. यावेळेस मोठ्या संख्येत महीला विळा ओम्बीचे लाल झेंडे व रिकामे हंडे घेऊन मनपा टाऊन हॉल कार्यालयासमोर उपस्थीत होत्या. निवेदनावर ॲड. अभय टाकसाळ (जिल्हा सचिव भाकप), कॉ. अनिता हिवराळे (शाखा सहसचिव), कॉ. मनिषा भोळे (शाखा सचिव), कॉ. राजु हिवराळे (संघटक), पुष्पाबाई बिरारे, मंडाबाई नवगिरे, बाबुलाल वाघ, मिलींद जाधव, जया दाभाडे, कविता गायकवाड, शिलाबाई दीवे, रंजना बनसोडे, शिलाबाई प्रधान, सुकन्या प्रधान, मनिषा जावळे, सुनिता नरवडे, नीता खरात, अरुणाबाई गायकवाड इ. च्या सह्या आहेत.

# बोरगावात चोरट्यांचा धुमाकूळ

## भोकर तालुक्यातील प्रकार, पाच जखमी, लाखोंचा ऐवज लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** वातावरणातील ऊकाडा यातच सुर्य अधिकच तापत असल्याने जिवाची काहिली होत आहे. पावसाळाजवळ आल्याने खरीप हंगामातील कामात शेतकरी गुंतून असताना औषधी, बी बियाणे दरवाढीने चिंतेत असताना दिनांक २४ रोज मंगळवारी भोकर तालुक्यातील बोरगाव येथे मध्यरात्री सहा ते सात अज्ञान चोरट्यांनी दगडफेक करून दहशत निर्माण केल्याने पाच ग्रामस्थ गंभीर जखमी झाले असून यात महिलाचाही समावेश आहे. सोने, चांदी, रोख रक्कम असा लाखोंचा ऐवज घेऊन चोरट्यांनी धूम ठोकली आहे.

भोकरपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या भोकर तामसा रोडवर बोरगाव असून तेथील ग्रामस्थ दिवसभर शेतात खरीप हंगामातील कामे आटोपून रात्रीला झोपी गेले असता मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास गावातील दत्तराम हूनाजी मेटेवाड यांच्या घरात सहा ते सात अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करुन धारदार शस्त्राचा धाक दाखवून जबर मारहाण केली व कपाटातील नगदी एक लाख रूपये आणि त्यांची पत्नी जिजाबाई यांच्या कानातील,



गळ्यातील सोन्याची, हातातील चांदीची दागिने हिसकावून घेतले.

या झटापटीत दत्तराम यांना नाकाला व कानाला तर जिजाबाई दत्तराम मेटेवाड यांच्या कानाला गंभीर दुखापत झाली आहे. त्यानंतर देवराव अनपवाड, शोभाबाई मारोती हुबेवाड, पार्वतीबाई माधव याटेवाड यांच्या घरी जाऊन दगडफेक केल्याने ते गंभीर जखमी झाले आहेत. मारोती धोंडीबा हूबेवाड, राम बोरगांवकर, सोपान लक्ष्मण एडके यांच्या घरातील कपाटाची नासधूस केली आहे. महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, तर काही ठिकाणी रोख रक्कम आणि शेतातील आखाड्यावरही मोर्चा वळवून दगडफेक केली आहे. या प्रकारामुळे गावात भीतीचे वातावरण पसरले आहे.

**चोरट्याची दगडफेक**

बोरगाव येथे मंगळवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी ग्रामस्थ झोपेत असताना अक्षरशः धुमाकूळ घातला. प्रारंभी दगडफेक करून दहशत निर्माण केली. आरडाओरड झाल्याने ग्रामस्थ जागे झाले. मदतीला धावून जात असताना चोरट्यांनी तुफान दगडफेक केल्याने कुणीही मदतीला जाण्याची हिंमत केली नाही. रात्रीला अंधार असल्याने दगड आपल्या दिशेनी येईल या भीतीमुळे ग्रामस्थ सैरावैरा पळू लागले होते, अशी माहिती तेथील ग्रामस्थांनी दिली आहे. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच बुधवारी गावात जाऊन पंचनामा अहवाल तयार करून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.



# प्रथम रुग्णवाहिका चालिका विषया लोणारे यांचा आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महिला सक्षमीकरण करण्यासाठी प्रेरणादायी असलेल्या प्रत्येक महिलेचा सन्मान करुन त्यांना प्रोत्साहन देणे काळाची गरज असल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी रवी भवन येथे सत्कारप्रसंगी सांगितले. प्रथम महिला रुग्णवाहिका चालिका डागा स्त्री रुग्णालयात कार्यरत असल्याचा आनंद होत असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

कोरोनासारख्या संकटात खंबीरपणे पुरोगामी विचारांना सन्मान देणारे आणि कोरोनासारख्या संकटात खंबीरपणे उभे राहुन महाराष्ट्राची आरोग्य सेवा सांभाळणारे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी आज आरोग्य सेवेतील प्रथम महिला रुग्णवाहिका चालिका विषया गोपीनाथ लोणारे यांचा शाल, श्रीफळ देवुन सत्कार केला.

महाराष्ट्रातील संस्कृती ही पुरोगामी विचार देणारी आहे. महिलांचा सन्मानाची शिकवण देणारी माँ जिजाऊ, स्त्रियांकरीता शिक्षणाची दारे उघडणारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भारतातील प्रथम महिला डॉ. आनंदीबाई जोशी, देशाच्या सर्वोच्च राष्ट्रपती पदी विराजमान होणारी प्रथम महिला श्रीमती प्रतिभाताई पाटील आदी अनेक महिला या राज्याने देशाला देवुन पुरोगामी विचारांचा आणि महिला सक्षमीकरणाचा झेंडा रोवला आहे. याच विचारांचा वारसा आरोग्य सेवेतील प्रथम महिला रुग्णवाहिका चालिका विषया गोपीनाथ लोणार (नागदेवे) यांनी चालविला. तिचे व्यक्तिमत्व समाजातील युवतींना प्रेरणा देणारे ठरत आहे, असे ते म्हणाले. वाहन चालक हा पेशा स्विकारल्यावर गर्भवती महिला, माता यांच्या सेवेत सदा सर्वदा 24 तास सेवा देणाऱ्या महिला रुग्णालयात रुग्णसेवा देतांना अत्यंत आनंद होत असून समाधान लाभत असल्याचे विषया लोणारे यांनी यावेळी सांगितले.

# राष्ट्रवादीच्या युवक प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी जिशान आफताब खान यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** मेहकर येथील दैनिक द जिल्हा एक्सप्रेस चे मुख्य संपादक जिशान आफताब खान यांची दिनांक 24 मे रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांनी नियुक्ती पत्र देवून राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश कार्यकारिणीच्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे.

या निवडीमुळे मेहकर मतदार संघ प्रमाणे मी ईतर ही ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसला बळकटी करण्याचे काम जीशान खान करणार आहेत त्यांच्या निवडीमुळे युवकांमध्ये नवचैतन्याचे भावना निर्माण झाली असून त्यांच्यावर मेहकर मतदार संघातून तसेच संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख, राष्ट्रवादीचे युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष रविकांत वरपे, कार्यालयीन सरचिटणीस अरुण आसाबे, राष्ट्रवादीचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष नाझेर काझी यांचे जीशान खान यांनी आभार मानले आहे. तसेच ॲड. नाझेर काझी, पालकमंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी जो विश्वास दाखवला आहे त्या विश्वासाला आपण तडा जाऊ देणार नाही. राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून पक्षाला बळकटी देण्याचे काम करू असे यावेळी जीशान खान यांनी बोलताना सांगितले.





# धक्कादायक; मुलानेच केला आई आणि आजीचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील तरवाडे येथील मायलेकीच्या दुहेरी हत्याकांडाचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेने 36 तासाच्या आतच उघडकिस आणला आहे. मुलाने आई आणि आजीचा खून केल्याचे स्पष्ट झाले आहे. चंद्रभागाबाई भावराव माळी (65) वंदना गुणवंत महाले (45) या खाटेवर झोपलेल्या असताना त्यांना कोणातरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन घातक हत्याराने दोघींच्या डोक्यावर वार करुन जिवे ठार मारले. याप्रकरणी तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेमार्फत सुरु असताना विविध संशयितांना तपासले असता मयत वंदना महाले हिचे कुटुंबात कौटुंबिक कलह असल्याचे निदर्शनास आले.

वंदनाचे चारित्र्याबाबत पती गुणवंत व मुले दिनेश व हितेश यांना संशय असल्याने त्यांचेत वाद होत असे. मयत वंदना ही सुमारे 3 महिण्यापासुन माहेरी तरवाडे येथे आई चंद्रभागासोबत राहत होती. वंदना महाले हिला पती गुणवंत महाले व मुलांनी सासरी येण्यासाठी मध्यस्थी मार्फतीने प्रयत्न केले होते. परंतु मयत चंद्रभागा ही मुलगी वंदना हिस पाठविण्यासाठी संमती देत नव्हती. याबाबी निदर्शनास आल्या होत्या. त्याआधारे व तांत्रिक विश्लेषणाचे आधारे एलसीबीचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना माहिती प्राप्त झाली की, हा गुन्हा मयत वंदनाचा लहान मुलगा हितेश गुणवंत महाले (19, रा.आडगाव ता.एरंडोल जि.जळगाव) याने केल्याचा संशय बळावला.

हितेश महाले यास ताब्यात घेवुन गुन्ह्याबाबत विचारपुस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली देवून सांगितले की, आई वंदना हिचे चारीत्र्यामुळे व वर्तणुकीमुळे सारे कुटुंब त्रस्त झाले होते. यामुळे दि. 23 रोजी मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास आडगाव येथुन तरवाडे येथे मोटारसायकलने येवुन सोबत आणलेल्या लोखंडी पाईपने आजी चंद्रभागाबाई व आई वंदना हिचे डोक्यात वार करुन ठार मारल्याची कबुली दिली आहे.

पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त केली. तसेच गुन्ह्यात वापरलेला लोखंडी पाईप परत जातांना फेकल्याची कबुली दिली असून त्याचा पोलीस शोध घेत आहेत. आरोपी हितेश गुणवंत महाले याला गुन्ह्याचे तपासकामी ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, सपोनि प्रकाश पाटील, बाळासाहेब सुर्यवंशी, योगेश राउत, पोहेकॉ संजय पाटील, प्रभाकर बैसाणे, रफीक पठाण, पोना योगेश चव्हाण, गौतम सपकाळे, राहुल सानप, कमलेश सुर्यवंशी, राहुल गिरी, सुनिल पाटील यांनी केली आहे.



# मनीषनगर येथे देह व्यापार चालवणाऱ्यांची दादागिरी

## कॉलनीतील रहिवाशी अतुल साठवणे यांच्यावर प्राणघातक हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मनीषनगर परिसर अमर संजय सोसायटीमध्ये कृष्णकुंज हॉटेल उघडलेला आहे. त्यामध्ये मुला-मुलींना रुम्स आणि रेस्टॉरंट प्रोवाईट करतात. मुलं आणि मुली कॉलनीच्या रस्त्यावर सिगरेट दारू, पिऊन हुलड बाजी करतात. अश्लील हरकत करून कॉलनीच्या रहवाशी लोकांना दादागिरी करून दाखवतात. अतुल साठवने यांनी विरोध केल्यावर कृष्णकुंज हॉटेलमध्ये आठ ते दहा लोकांनी प्राणघातक हल्ला केला. त्यानंतर घरावरती जाऊन शिव्या गाळ, जीवे मारण्याची धमकी दिली.

कृष्णाकुंज ओयो हॉटेलवाल्यांची दादागिरी पाहून कॉलनीच्या रहिवाशी लोकांनी जिल्हाधिकारी आर. विमला व पोलिस आयुक्त अमितेशकुमार, पोलीस जॉईंट कमिशनर, तहसीलदार पाटील बेलतरोडी सहाय्यक पोलीस अधिकारी व बेलतरोडी पोलीस निरीक्षक चंद्रकांत यादव या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेट घेऊन निवेदन दिले. हॉटेलच्या लायसन्स रद्द करून बंद करण्यात यावे जे युवा जोडपे येऊन कॉलनी च्या लोकांना त्रास देत आहे ते बंद करावे. अन्यथा सर्व नागरिक रस्त्यावर येऊन आंदोलन करणार याची सर्व जबाबदारी मा.वरिष्ठ अधिकाऱ्यांची राहणार आहे.

मनीषनगर परिसरात कॉलनी मध्ये रहिवाशी शिष्टमंडल नागरिक राधाताई साठवणे, सौ.पल्लवी दहीकर, सौ.पुष्पा तनखीवाले, सौ.देवला कावडकर, सौ.जयश्री देशपांडे, सौ.कांचन तोटे, सौ.प्रमिला कापसे, सौ.ज्योती शर्मा, जुही शर्मा, यादव राव लायबर, रामदास पाटील, अनिल वसुले, परसराम बानाईत, शांतीलाल ठाकरे, विनोद पागिरे, अभय धुर्वे, ए.पी.चक्रधरे, अशोक गिरडकर, एच.के.काटे, राजु भगत, प्रवीण बा.शर्मा मनोज तिवारी, आदि नागरिक उपस्थित होते.

# नगरपालिका प्रशासकाकडून दुर्गानगर रहिवाशांची फसवणूक

## सूर-ताल संगीतसम्राट तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांचा ३० तारखेला आत्मदहनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** गेल्या पाच ते सहा वर्षांपासून दुर्गा एलआयसी रोड येथील नागरिक पक्क्या रस्त्यासाठी आंदोलने करत आली आहेत. अनेक वेळा नगरपरिषदेला विनंती केली, निवेदने दिली. आता प्रशासक नेमल्यावरही प्रशासनाला निवेदनेही दिलेली आहेत. परंतु प्रत्येक वेळी नगरपरिषदेने दुर्गानगर रहिवाशांच्या मागणीकडे दुर्लक्षच केलेले आहे. यापूर्वीही रस्त्याच्या मागणीसाठी अंबाजोगाई नगरपरिषदेच्या पायऱ्यावर बैठा सत्याग्रह करून निषेध व्यक्त करण्यात आला होता. त्यावेळी मुख्याधिकारी यांनी तात्काळ रस्ता बनवून देऊ असे लेखी आश्वासन दिले होते. सदरील रस्त्यासाठी बजेट मंजूर झाले आहे असेही अनेक वेळा सांगण्यात आले परंतु रस्ता काही झाला नाही.

दुर्गानगरमध्ये प्रवेश करण्यासाठी असलेल्या नाली क्रॉसिंग वरील



स्लॅब तुटून स्टील वर आल्यामुळे माणसांनाही चालणे मुश्कील झाले होते. मुख्याधिकारी महोदयांना दोन वेळा फोनवरून कल्पना देऊन सुद्धा त्यांनी केवळ अभियंत्यांना पाठवतो असे म्हणून वेळ मारून नेली. अखेर नागरिकांनाच त्या क्रॉसिंगची दुरुस्ती करावी लागली पण नगर परिषदेचा एकही माणूस तिकडे फिरकला नाही. एल.आय.सी रोडवर अनेक ठिकाणी पाईपलाईन फुटलेली आहे.

ज्यावेळी नळाला पाणी येते त्यावेळी एल.आय.सी रोड हा पूर्णतः पाण्याने भरून वाहत असतो. याबाबतही अनेक वेळा कल्पना दिली पण प्रशासनाने याकडेही दुर्लक्ष केले. एल.आय.सी रोडवरच्या नाल्या कधीच स्वच्छ केल्या जात नाहीत. बाराही महिने त्या नाल्या तुंबलेल्या असतात. दुर्गा नगरच्या रस्त्या संदर्भात एप्रिल महिन्यात प्रशासकांना




भेटण्यासाठी गेलो असता त्याठिकाणी नगरअभियंता व नगररचनाकार यांच्या उपस्थितीमध्ये मुख्याधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा केली. त्यावेळी त्यांनी 6 मे रोजी दुर्गा नगरच्या रस्त्याचे टेंडर उघडण्यात येणार असून त्यानंतर 15 मे पर्यंत तुमच्या रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल असे आश्वासन दिले होते. आज 20 मे तारीख उजाडली तरीही रस्त्याच्या कामाला सुरुवात झालेली नाही.

**मुख्याधिकारी सातत्याने गैरहजर राहत अमावस्या-पौर्णिमेला भेटतात**

नगरपालिकेत मुख्याधिकारी महोदय कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. ते अमावस-पौर्णिमेलाच भेटतात. मग न्याय मागायचा तरी कुणाकडे ? त्यामुळे हतबल होऊन कठोर निर्णय घ्यायची वेळ आलेली आहे. मोदींच्या ताटाखालचे मांजर मुख्याधिकारी जाणीवपूर्वक नागरिकांना मानसिक त्रास देत आहेत ? राजकारण्यापेक्षाही गलिच्छ राजकारण मुख्याधिकाऱ्याकडून होत आहे. हे अत्यंत निंदनीय आहे. दि. 30 मे पर्यंत जर प्रत्यक्ष रस्त्याच्या कामाला सुरुवात नाही झाली. तर 30 मे रोजी नगरपरिषदेच्या पायऱ्यावर "आत्मदहन" करण्यात येईल असा इशारा संगीतकार मार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी नगरपरिषद प्रशासनाला दिलेला असून याबाबतचे निवेदन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना अंबाजोगाई तहसीलदार-उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत देण्यात आले आहे.

# भाजपा उद्योग आघाडीचे उल्लेखनीय कार्य : देवेंद्र फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाच्या वतीने उद्योग आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा एक दिवसीय प्रशिक्षण वर्ग तथा उद्योग परिषद भाजप कार्यालय,वसंत स्मृती दादर ईस्ट, मुंबई या ठिकाणी दि.२४ मे २०२२ रोजी आयोजित केला होता. हा कार्यक्रम प्रदेश पदाधिकारी,विभागीय पदाधिकारी आणि जिल्हा संयोजक, सहसंयोजक, जिल्हा कार्यकारिणी सदस्य व विशेष निमंत्रित यांच्यासाठी आयोजित केला असल्याने या अभ्यास वर्गास उद्घाटक म्हणून लाभलेले प्रसिद्ध उद्योजक श्रीराम दांडेकर, प्रदेश उपाध्यक्ष तथा उद्योग आघाडी प्रभारी राज पुरोहित, प्रदेशाध्यक्ष प्रदीप पेशकार, सरचिटणीस सुधीर धुत्तेकर, विश्वजित देशपांडे सर्वांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रास्ताविकात गिरीधर मंत्री म्हणाले की, सरकारला रोजगारनिर्मिती हा एक महत्वाचा प्रश्न असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात पहिल्यावेळी गडकरी साहेबांना लघु, मध्यम उद्योग मंत्रालय दिले गेले व श्रीमान नितीन गडकरी साहेबांनी आपल्या कौशल्याने देशभरात युवकांना रोजगार देणारे उद्योजक बनविण्याचे ध्येय गाठले होते, यामुळे संपूर्ण देशभरात रोजगाराचा प्रश्नमुक्त होण्यासाठी वाटचाल सुरूवात झाली. तसेच विद्यमान मंत्री नारायण राणे हे सुद्धा अत्यन्त स्तुत्य असे कार्य करत




आहेत. या सर्व वरील विशेष मागण्यांसाठी उद्योग आघाडी ही वारंवार मागणी करत होती. आपण सर्वांनी रोजगार वाढीसाठी सर्व उद्योजकांनी प्रयत्न करावेत.

बहुप्रतिक्षित अभ्यासवर्ग व राज्यपरिषदेत राज्यातून विविध विभागातून कार्यकर्ते उपस्थित झाले होते. उद्योग संबंधित क्षेत्रात काम करण्याचे प्रशिक्षण का? आपल्याकडून पदाधिकारी म्हणून पार्टीची काय अपेक्षा? राष्ट्रसेवेसाठी आपले योगदान काय? सर्व उद्योग आघाडी पदाधिकारी यांनी उद्योग करणे हीच राष्ट्रसेवा हे जनसमाणसात बिंबविले पाहिजे. उद्योजक हे राष्ट्रीय कार्य करतात, हे समाजात उतरविले पाहिजे, सर्व शासकीय योजना अंत्योदय पर्यंत पोहचविणे, अंमलात आणणे हे कार्य प्रदेश/विभाग/जिल्हा कार्यकर्त्यांनी कार्य केले पाहिजे. यातून उद्योगांची व राष्ट्राची प्रगती होईल.


आता आपले ध्येय हे "ग्रोथ" (प्रगती) हे आहे. कार्पोरेट क्षेत्रात जेव्हा आपण पाहतो, त्यात आपल्या उद्योगाचे बजेट प्लॅनिंग, मार्केटिंग व उभारी यासाठी विविध तज्ञांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. यात लघु, मध्यम, उद्योग मंत्रालय संचालकांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास राज्यातील विविध उद्योग संघटना पदाधिकारी उपस्थित होते व भारत सरकारच्या सर्व योजना सामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी सर्व कार्यकर्ते काम करतील, भविष्यात असे कार्यक्रम जिल्हास्तरावरही आयोजित केले जातील.

उद्योग परिषदेचे मुख्य मार्गदर्शक विद्यमान विरोधी पक्षनेते व माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रकांत दादा पाटील, संघटनमंत्री श्रीकांत भारतीय,उद्योग आघाडी प्रदेशाध्यक्ष प्रदीप पेशकार इतर काही केंद्र/राज्य प्रदेश नेते व अनेक विषयातील तज्ञ व तसेच केंद्रीय मंत्रालयातील काही निमंत्रित अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले असून आपल्या देशातील भाजपा सरकारच्या यशस्वी वाटचालीच्या ८ वर्षांच्या कार्यकाळातील हा एक महत्त्वाचा टप्पा होता. यात सर्व अपेक्षित कार्यकर्ते पूर्णवेळ सहभागी होते.

# चांगले व्यक्तिमत्त्व घडवलेल्यांचे सेल्फी चांगलेच येतात : डॉ. घाणेकर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कुठलेही व्यक्तिमत्व जे खुलते ते बाह्यांग कसे आहे यामुळे ठरत नाही तर अंतरंग चांगले असेल तर ते व्यक्तिमत्व निश्चितच खुलते. व्यक्तिमत्व यशस्वी, प्रभावी, घडण्यासाठी अंतर्मनाचा विकास घडवण्यासाठी सातत्याने उच्च आदर्शवादाचे आचरण करीत रहाणे हे आवश्यक असते, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कीर्तिचे कलावंत आणि फोटो वर्ल्ड संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. मधुसूदन घाणेकर यांनी केले. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर दैदीप्यमान कामगिरी करणाऱ्या 8 यशस्वितांना नुकताच 2022चा इंटरनॅशनल सेल्फी ॲवॉर्ड ऑनलाईन प्रदान करण्यात आला. याप्रसंगी डॉ.मधुसूदन घाणेकर बोलत होते.


इंटरनॅशनल सेल्फी ॲवार्ड2022 चे मानकरी

वर्ल्ड व्हिजन संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष-प्रा.नागेश हुलावळे, नेदरलॅंडसच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कवयित्री डॉ. मानसी मोहरिल, आंतरराष्ट्रीय पातळीवर पत्रकारिता करणाऱ्या ॲड. प्रणिता देशपांडे-नेदरलॅंडस, भारत-बेल्जियम मैत्रीसंघाच्या अध्यक्षा प्रिती दबडे, हायकू इंटरनॅशनलच्या अध्यक्ष योगिता पाखले, काव्यसखी काव्यमंच संस्थेच्या संस्थापक-अध्यक्ष प्रतिमा काळे, अक्षरआनंद इंटरनॅशनलचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. योगेश जोशी आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर लघुपटासाठी उच्च प्रतिचे यश संपादन करणाऱ्या जयश्री शेंडे यांना इंटरनॅशनल सेल्फी ॲवॉर्ड प्रदान करण्यात आला.

# 'अनोख्या कथा'चे रविवारी प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या लेखक वंदेश पुरव यांच्या 'अनोख्या कथा ' या कथासंग्रहाचे प्रकाशन रविवारी दुपारी ४ वाजता लोकनायक जयप्रकाश नारायण विद्यालय, आगरवाडी, ता. जि. पालघर स्टेशन, सफाळे, (प. रे.) या ठिकाणी होणार आहे. प्रवीण दवणे, पत्रकार पंकज दळवी, लेखक जगन्नाथ घरत, लेखिका संध्या शहापुरे, लेखिका डॉ.सुचिता पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# भारतीय विचार साधनेच्या पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने 'स्वातंत्र्याचा जागर' या पुस्तक मालिकेत 'भारतीय विचार साधना' करीत असलेले कार्य अतिशय अभिमानास्पद आहे. तरुण लेखिकांनी 'घागर मे सागर भरायचे' तंत्र अवलंबून कुमारवयीन पिढीसमोर आपल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील नवा इतिहास समोर ठेवला आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध अनुवादक आणि लेखिका उमाताई कुलकर्णी यांनी रविवारी केले.

येथील पाषाण परिसरात 'भारतीय विचार साधना' आयोजित प्रकाशन समारंभात त्या बोलत होत्या. रुपाली भुसारी यांच्या स्वातंत्र्यलढा आणि साम्यवाद' आणि शिल्पा निंबाळकर यांच्या 'स्वातंत्र्य संग्राम आणि शेतकरी सहभाग' या पुस्तकांचे प्रकाशन यावेळी झाले. उमाताई कुलकर्णी, डॉ. गिरीश आफळे, डॉ. संतोष गटणे, रुपाली भुसारी आणि शिल्पा निंबाळकर यावेळी उपस्थित होत्या.

नवप्रकाशित पुस्तके पुढील पिढीसाठी अतिशय उपयुक्त आहेत. आपल्या देशाचा इतिहास केवळ काही ठरावीक मुद्दे सांगून अधोरेखित करण्याचे कार्य एक विशिष्ट विचारधारा करीत आहे. अहिंसेने स्वातंत्र्य मिळाले, असे सांगणारे सोयीस्कररित्या या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी बलिदान दिल्याचे सांगायला विसरतात, " असे मनोगत यावेळी उमाताई कुलकर्णी यांनी व्यक्त केले.



प्रमुख वक्ते डॉ. संतोष गटणे यांनी आपले प्राधन्यक्रम अतिशय महत्त्वाची भूमिका निभावतात. कृषी क्षेत्राला प्राधान्य क्रम देणे काळाची गरज आहे. विविध बिजांमध्ये जेनेटीकली मॉडीफाईड बीजांचा मारा अनेक परकीय देशांकडून होत असतो. त्यामुळे आपण त्यांच्यावर अवलंबून राहावे हा कुठेतरी त्यांचा हेतू असतो. देशाला अशा नव्या पारतंत्र्यात जाण्यापासून रोखणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले.

व्यासपीठावरील प्रमुख मान्यवर डॉ. गिरीश आफळे यांनी उमाताई यांचा गौरव केला आणि लेखिकांचे स्वागत केले.

रुपाली भुसारी यांनी साम्यवादी विचारांमुळे देशाच्या फाळणीला वैचारिक विष दिले गेले. साम्यवाद्यांचा राष्ट्र ह्या संकल्पनेवर विश्वास नाही. सोव्हिएत रशियाच्या धोरणाप्रमाणे त्यांनी त्याकाळी धोरणे बदलली आणि स्वातंत्र्यलढ्यात अडथळे आणले. हिंसा आणि रक्तरंजित क्रातीवर त्यांचा विश्वास आहे त्यामुळे हे मानवतेच्या विरोधात आहेत. आजच्या नक्षलवाद आणि अर्बन नक्षलवादापर्यंत याचे धागेदोरे आहेत. ते तपशीलाने जाणून घेण्यासाठी पुस्तिका नक्कीच मदत करेल असा विश्वास व्यक्त केला.

शिल्पा निंबाळकर यांनी शेतकरी चळवळ आणि त्याचे भारतीय स्वातंत्र्य लढ्याला मिळालेले बळ याविषयी मत मांडले. शेतकरी आंदोलन, शेतकऱ्यांवर झालेले अत्याचार याचा ब्रिटीशांच्या विरोधी जनमत तयार व्हायला फायदा झालेला आहे. शेतीच्या व्यापारीकरणाचे दूरगामी परिणाम झाले आहेत. शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील एकूण योगदानाविषयी जाणून घेण्यासाठी भाविसाची पुस्तिका मार्गदर्शक ठरेल असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक करताना महेंद्र वाघ यांनी ही एक चळवळ असल्याचे सांगून 'स्वातंत्र्याचा जागर' या मालिकेत १९ पुस्तकांची निर्मिती केली जात आहे. काळाची गरज ओळखून आता 'ई-बुक्स' उपलब्ध आहेत अशी माहिती दिली. या उपक्रमात पुढाकार घेणाऱ्या विवेक जोशी आणि राजन ढवळीकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन अदिती मोगरे यांनी तर मिलिंद महाजन यांनी आभार मानले. लक्ष्मी पानट यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# उस्मानाबाद जिल्ह्यात खरीप मशागतीला वेग

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** हवामान खात्याच्या अंदाजानुसार यावर्षी मान्सूनचे आगमन लवकरच होण्याचे सांगण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामाची तयारी सुरू केली आहे. यावर्षी सहा लाख 22 हजार 100 हेक्टर प्रस्तावित क्षेत्रावर खरीपाची पेरणी होईल असे कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे. गतवर्षीपेक्षा यावर्षी २५हजार हे. सोयाबीन क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता कृषी विभागाने वर्तविली आहे. जिल्ह्यात सोयाबीनचा पेरा वाढनार असला तरी, नैसर्गिक आपत्ती कीड-रोग परतीचा पाऊस यामुळे सोयाबीन हे एक ते एक पीक न करता शेतकऱ्यांनी मिस्त्री पिके घेणे गरजेचे आहे.

मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात गेल्या काही वर्षापासून पावसात खंड होता.

पण गत दोन-तीन वर्षांमध्ये जिल्ह्यात सरासरीएवढा पाऊस होत असल्यामुळे खरिपाची पेरणी वेळेत होत आहे. प्रत्येक वर्षी कृषी

## जिल्ह्यातील सहा लाख हेक्टर क्षेत्र
## 4 लाख हेक्टर क्षेत्रावर होणार सोयाबीनचा पेरा; तीळ, मका,कापूस खरीप पिकाकडे शेतकऱ्यांची पाठ



विभागाकडून खरिपाच्या बियाण व खताच्या उद्दिष्टाच नियोजन केले जाते. यावर्षीही जिल्ह्यात खरिपाचे नियोजन करण्यात आले आहे. या वर्षी जिल्ह्यात सहा लाख 22 हजार100 हेक्टरवर पेरणी चे उद्दिष्ट आहे.

गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी 25 हजार हेक्टर जास्तीच्या क्षेत्रावर सोयाबिन पेरणी होणारं असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात येत आहे. सोयाबीनला जरी बऱ्यापैकी दर मिळत असला तरी, गेल्या वर्षी कपाशीला चौदा हजार प्रति क्विंटल दर मिळाला हेही शेतकरी विसरायला नकोय.

तूर पेरणी करणारे शेतकरी ही सोयाबीन पेक्षा जास्त फायदा होत असल्याने शेतकऱ्यांनी तूर पिक पेरणी करावी. त्याचबरोबर तृण धान्य मध्ये तूर, बाजरी, पिवळी, मूग हेही महत्त्वाचे पीके असल्याने

> **मागील वर्षी परतीच्या पावसाने सोयाबीन पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांची अतोनात नुकसान झाले. कपाशीचा विक्रमी 14 हजार रुपये प्रतिक्विंटल भाव पाहता. कापूस पीक लागवड करणे ही शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरेल.**
> **-संजय दराडे, कृषी अधिकारी, उस्मानाबाद**

मिश्र पिके घेऊन एकाच पिकावर अवलंबून न राहता अनेक पिके करून शेतकऱ्यांनी त्याचा फायदा घ्यावा तसेच खरिप ज्वारी,पिवळी, बाजरी हि पिके पेरणी केल्याने जनावरांचा चारा टंचाई प्रश्न मिटेल.

जिल्ह्यासाठी यावर्षी 96 हजार 200 मेट्रिक टन खताची मागणी करण्यात आलेली आहे. तर मागील वर्षी चे 18 हजार 187 मेट्रिक टन खत साठा शिल्लक आहे.

वाढता सोयाबीन पेरा पाहता बोगस बियाण्यांचा फटका शेतकऱ्यांना बसू शकतो.



# राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात होणार ५० हजार कोटींची गुंतवणूक

## ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या प्रयत्नांना यश, महत्त्वपूर्ण सामंजस्य करारावर जागतिक आर्थिक परिषदेत स्वाक्षऱ्या

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दावोस येथे सुरू असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्रात ५० हजार कोटींची गुंतवणूक खेचून आणण्यात ऊर्जा विभाग व ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत हे यशस्वी ठरले आहेत. राज्यातील अपारंपरिक ऊर्जा क्षेत्राच्या विकासाला यामुळे गती मिळणार असून २०० मेगावॅट वीज आणि ३० हजार नवे रोजगार या गुंतवणुकीतून उपलब्ध होणार आहेत. राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात नवी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत व महाराष्ट्र सरकारच्यावतीने प्रयत्न केले जात आहेत.
याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून डॉ. राऊत हे सध्या दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत सहभागी झाले असून ऊर्जा क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणूक खेचून आणण्यासाठी ते स्वतः प्रयत्न करीत आहेत. या संदर्भात त्यांनी दावोस येथे ऊर्जा क्षेत्रातील अनेक महत्वाच्या कंपन्यांच्या प्रमुखांची भेट घेऊन चर्चा केली. त्यांच्या या प्रयत्नांना मोठे यश लाभले असून राज्यात अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात ५० हजार कोटींची गुंतवणूक करण्याचा निर्णय रिन्यू पॉवर कंपनीने घेतला आहे.
महाराष्ट्र सरकारच्या वतीने महावितरण व गुरूग्राम येथील मेसर्स रिन्यू पॉवर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी यांच्यात या गुंतवणुकीबद्दल महत्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. महावितरणच्यावतीने या कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल आणि रिन्यू पॉवरच्यावतीने या कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सुमंत सिन्हा यांनी स्वाक्षऱ्या केल्या.



हा करार महाराष्ट्र राज्य व महावितरणसाठी मोठी उपलब्धी आहे. राज्यात हजारो कोटींची गुंतवणूक खेचून आम्ही यशस्वी झालो, याचा आनंद आहे. यामुळे रोजगाराच्या ३० हजार नवीन संधी उपलब्ध होणार आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे ऊर्जामंत्री डॉ नितीन राऊत यांनी दावोस येथे सुरू असलेल्या आर्थिक परिषदेत या करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर व्यक्त केली.

**२५ वर्षांसाठी करार!**

महावितरण व मेसर्स रिन्यू पॉवर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी यांच्यात ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूकीचा करार करण्यात आला. २०० मेगावॅट वीज या गुंतवणुकीतून दररोज राज्याला भविष्यात मिळणार आहे. हा करार २५ वर्षांसाठी करण्यात आला आहे. २०२२ ते २०२८ या ७ वर्षांच्या कालावधीत ही गुंतवणूक केली जाणार आहे. तर या प्रकल्पामुळे सुमारे ३० हजार रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे.
या करारानुसार सौर, वायू, हायब्रीड, बॅटरी स्टोरेज (विजेची साठवणूक), हायड्रोजन आदी पर्यायांच्या माध्यमातून रिन्यू पॉवर लिमिटेड कंपनी राज्याला २०० मेगावॅट वीज पुरवठा करेल.
महाराष्ट्र राज्य या प्रकल्पासाठी आवश्यक अशा सर्व परवानग्या, नोंदणी प्रक्रिया, मंजुरी आदी संबंधित ऊर्जा विभागाकडून मेसर्स रिन्यू पॉवर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला एक खिडकी योजनेतून राज्य शासनाच्या नियमावली व धोरणानुसार उपलब्ध करून देणार आहे.




# भारतीय प्रशासकीय सेवा पूर्वतयारी प्रशिक्षण केंद्रास उच्च शिक्षण मंत्री सामंत यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारतीय प्रशासकीय सेवा पूर्वतयारी प्रशिक्षण केंद्रास उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज येथे भेट देऊन प्रशिक्षण संस्था आणि वसतीगृहाची पाहणी केली.
प्रशिक्षण केंद्राचे संचालक प्रमोद लाखे, विज्ञान संस्थेच्या संचालक डॉ. अंजली रहाटगावकर, मॉरिस कॉलेजच्या संचालक डॉ. सुजाता व्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जनार्दन भानुसे यावेळी उपस्थित होते.
भारतीय प्रशासकीय सेवेत मराठी अधिका-यांचा टक्का वाढावा, यासाठी राज्य शासन जाणिवपूर्वक प्रयत्न आहे.
नागपूरसह राज्यात सहा ठिकाणी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्वतयारी प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. इतर ठिकाणच्या संस्थांमध्ये व्यवस्थित प्रशिक्षण सुरु आहेत मात्र नागपूर हे उपराजधानीचे शहर असूनही येथील वसतीगृह नूतनीकरण आणि डागडुजीसाठी विद्यार्थ्यांना या सत्रात प्रवेश देण्यात आला नाही, ही बाब गंभीर असल्याचे श्री. सामंत यांनी सांगितले.
नागपुरातील विद्यार्थी नाशिक येथील प्रशिक्षण संस्थेत अभ्यास करत आहेत. केवळ नूतनीकरणाच्या नावाखाली येथील विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारणे योग्य नसल्याचे सांगून येथील संचालकांनी ही बाब वेळीच लक्षात आणून दिली असती तर खासगी शैक्षणिक संस्थांच्या वसतीगृहात येथील १२० विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था करता आली असती असे सांगून उच्च शिक्षण विभागाशी सुसंवाद ठेवण्याचे निर्देश श्री. सामंत यांनी दिले.
विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी सत्रातील विद्यार्थ्यांना अधिकचे सहा महिने येथील वसतीगृहात राहू देण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांकडे आपली तक्रार मांडण्यासाठी आलेल्या सहा विद्यार्थ्यांना राहण्यासाठी तात्काळ वसतीगृह उपलब्ध करून देण्याच्या सूचना श्री. सामंत यांनी संचालकांना दिल्या.

# परतूर शहरातील एका गल्लीला चक्क पाकिस्तान गल्ली असे नाव

## आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला संताप

आधुनिक केसरी न्यूज



**परतूर :** येथे एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. परतूर शहरात एका गल्लीचे नाव थेट 'पाकिस्तान गल्ली' असे ठेवण्यात आल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. परतूर नगरपरिषदेने मालमत्ता कर वसुलीसाठी दिलेल्या पावतीवर पाकिस्तान गल्ली असा उल्लेख करण्यात आला आहे. परतूर नगरपरिषदेच्या या कृतीवर भाजप नेते आणि माजीमंत्री, आमदार बबनराव लोणीकर यांनी संताप व्यक्त केला आहे.
परतूर नगरपरिषदेने अतिशय क्लेशदायक कृती केली आहे. परतूर शहरातील एका गल्लीला चक्क पाकिस्तान गल्ली असे नाव देऊन समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी तात्काळ गंभीर दखल घेऊन शासन आणि प्रशासनाने संबंधितावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हे दाखल करावा. आरोपींवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे.
गेल्या पंचवीस वर्षांपासून परतुरची नगरपालिका काँग्रेसच्या हाती आहे. अशा प्रकारचे हे षड्यंत्र झाल्याने काँग्रेसला काय परतूर शहरात पाकिस्तान निर्माण करायचा आहे का?, असा संतप्त सवाल माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित केला आहे. राजकारणात इतक्या घाणेरड्या स्तरापर्यंत जाऊन अशी कृती करणारे दोषी आहेत. मग तो कोणीही असो. कर्मचारी असो, राजकारणी असो या सर्वांवर कारवाई झालीच पाहिजे, अशा प्रकारची मागणी लोणीकर यांनी केली.
विकासाच्या बाबतीमध्ये बोंबाबोंब, स्वच्छतेच्या बाबतीत कुठलीही भूमिका न घेणारी नगरपालिका, त्याचबरोबर पंधरा-पंधरा दिवस नगरपालिकेच्या नळाला पाणी येत नाही.
या सर्व प्रश्नांना सोडून हिंदू-मुस्लिमांमध्ये तेढ निर्माण करण्याचे षडयंत्र ज्यांनी कोणी रचल आहे त्यांना शासन-प्रशासनाने मोकळं सोडू नये, अशा तीव्र शब्दांमध्ये आमदार लोणीकर यांनी या कृतीचा धिक्कार केला आहे. घरपट्टी पावती देताना पालिकेची ही कृती उघड झाली आहे. अशा प्रकारचे कृत्य देशासाठी विघातक असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले.



# आंतरराष्ट्रीय गौतम बुद्ध गौरव पुरस्कार डॉ. धर्मराज सुरोसे यांना प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** एकता फाउंडेशन नागपूर यांच्याकडून दिला जाणारा तथागत गौतम बुद्ध आंतरराष्ट्रीय गौरव सन्मान पुरस्कार 2022 महात्मा फुले महात्मा फुले ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तसेच प्रधानमंत्री जनकल्यान योजना अभियान चे जिल्हाध्यक्ष डॉ. धर्मराज सुरोसे यांना प्रदान करत असल्याची माहिती एकता फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ संजय रामटेके यांनी दिली. डॉ.धर्मराज सुरोसे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# प्रतिबंधित मागुर मत्स्यसंवर्धावर मत्स्यव्यवसाय विभागाची कारवाई



आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** मत्स्यपालन करण्यास प्रतिबंध असलेल्या थाई मागुर प्रजातीच्या माशाचे कोन्धारा ता. केळापूर येथे मत्स्य संवर्धन करण्यात येत असल्याचे आढळून आल्याने या ठिकाणी मत्स्यव्यवसाय विभागाने मत्स्यसाठा नष्ट करून कारवाई केली.
हरित लवाद नवी दिल्ली यांच्या आदेशानुसार थाई मागुर माश्याचे प्रजनन, मत्स्यपालन व विक्री करण्यावर बंदी असून सदर माश्याचे अस्तित्वात असलेले मत्स्य साठे नष्ट करण्याचे निर्देश आहेत. यानुसार मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी न.या. पिंगलवार व शि.अ.चव्हाण तसेच पांढरवकडाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हे.भ.कोळी व कॉन्स्टेबल सि.भ.कांबळे यांच्या उपस्थितीत कोन्धारा येथे प्रतिबंधीत मत्स्य साठा शेतालगतच्या खड्ड्यात शास्त्रोक्त पद्धतीने पुरून नष्ट करण्यात आला असल्याचे मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्त सु.वा.जांभुळे यांनी सांगितले.

DON'T NEGLECT YOUR HEALTH
HEALTH IS WEALTH
A TRUSTED SUPAR MARKET IN CITY

MAHAVIR
GHAR SANSAR
● Wholesale & Retail
● Kirana, Dry Fruits, Spices
● Crockery, Home Appliances
● Home Cleaning Material, Steel & Aluminium
● Plastic Items & Many More
Sumit 7620111118
Rajesh Jain 758834738
Ramesh Jain (Crockery) 9860481142 7620111117
Whatsapp Order & Any Order 9850017181
Delivery Status 9021395308 9657398232
Wholesale Enquiry 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. Road, Chelipura, Shahgunj, Aurangabad
Plot No. A25, Opp MIDC Police Station MIDC Chikalthana, Aurangabad

# दारूप्रमाणेच इंधनावरील करात 50 टक्के कपात करा: प्रवीण घुगे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जनतेच्या खिशातून हजारो कोटींची लूट केल्यानंतर आता पेट्रोल, डिझेलवरील मूल्यवर्धित करामध्ये अनुक्रमे २.०८ रुपये व १.४४ रुपये कपातीचा केवळ कागदी गाजावाजा करून ठाकरे सरकारने पुन्हा एकदा जनतेच्या डोळ्यात धुळफेक केली आहे. महागाईने त्रासलेल्या जनतेस दिलासा देण्याऐवजी केंद्राविरुद्धच्या राजकारणात जनतेला वेठीस धरण्याचा ठाकरे सरकारचा डाव उघड झाला असून राज्याच्या करामध्ये ५० टक्के कपात करून जनतेला दिलासा द्यावा अशी मागणी भाजपचे प्रदेश चिटणिस प्रविण घुगे यांनी केली आहे.

केंद्र सरकारने गेल्या सहा महिन्यांत दुसऱ्यांदा पेट्रोल-डिझेलवरील अबकारी करात कपात करून जनतेला मोठा दिलासा दिल्यावर ठाकरे सरकारने दीड ते दोन रुपये कपात करून राज्यातील जनतेची क्रूर चेष्टा केली. महाराष्ट्रात पेट्रोलवर लिटरमागे ३२.५५ रुपये तर डिझेलवर लिटरमागे २२.३७ रुपये एवढा कर राज्य सरकार आकारते. केंद्र सरकारने कर कपात करून राज्याचा कर कमी करण्याचे आवाहन केल्यानंतरही ठाकरे सरकारने कर कमी केले नाहीत, उलट अनावश्यक वाद घालून राजकारण सुरू ठेवले. एकीकडे महागाईच्या नावाने सत्ताधाऱ्यांनीच निदर्शने करायची आणि दुसरीकरे कर कपात न करता जनतेची लूट सुरूच ठेवायची असा दुटप्पी डाव महाविकास आघाडी खेळत असून केंद्राशी संघर्ष करण्याच्या खुमखुमीतून जनतेला



महागाईच्या खाईत भरडण्याचा कपटी खेळ उघड झाला आहे, असे ते म्हणाले.

ठाकरे सरकारने दारुवरील करात तब्बल ५० टक्क्यांची कपात करून दारू उत्पादकांना मोठा मलिदा मिळवून दिला. मात्र इंधनाच्या किंमती कमी झाल्यास महागाई कमी होऊन सर्वसामान्यांना दिलासा मिळेल हे ठाऊक असूनही पेट्रोलवर जेमतेम दोन रुपयांची कपात करून जनतेला दिलासा नाकारला, असा आरोपही त्यांनी केला. विदेशी मद्याला दिलेल्या सवलतीप्रमाणेच पेट्रोल डिझेलवरील राज्याच्या व्हॅट आकारणीतही ५० टक्के कपात झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. आपण धूर्त राजकारणी आहोत असे सांगत मुख्यमंत्र्यांनी अलीकडेच स्वतःची पाठ थोपटून घेतली होती. आताच्या कर कपातीचे गाजर दाखवून जनतेला राज्य सरकारकडून प्रत्यक्षात कोणताच लाभ मिळणार नाही याची काळजी घेत ठाकरे यांनी पुन्हा तेच दाखवून दिले आहे, अशी टीकाही त्यांनी केली. मुळात ठाकरे सरकारने कर कपातीचा केवळ कागदावरच गाजावाजा केला असून ही कर कपात प्रत्यक्षात आणून जनतेला दिलासा देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यासंबंधीचा अधिकृत आदेश जारी करण्यातही ठाकरे सरकार टाळाटाळ करीत आहे. जनतेची क्रूर चेष्टा करणाऱ्या सरकारचा हिंस्र चेहरा यातून उघड झाला आहे, असेही ते म्हणाले.



# 10 जून रोजी मजनू चित्रपट रसिकांच्या भेटीला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** "धुमस" या चित्रपटाच्या यशानंतर शिवाजी दोलताडे "मजनू" हा चित्रपट घेवून येत आहेत. प्रेमाची अनोखी परिभाषा सांगणारा हा चित्रपट आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन शिवाजी दोलताडे यांनी केले असून शिवाजी दोलताडे म्हणाले, की प्रत्येकजन कॉलेजला गेल्या नंतर स्वतःला मजनू समजतो जे लोक हा चित्रपट पाहतील. त्यांना त्यांच्या कॉलजेच्या दिवसांची आठवण आल्याशिवाय राहणार नाही. कोरोनाच्या काळात सर्व काळजी घेवून चित्रित झालेला हा चित्रपट आहे.

मजनू या चित्रपटाचे निर्माते गोवर्धन दोलताडे हे असून संगीतकार पी शंकरम्, सचिन अवघडे, साजन - विशाल, पार्श्वसंगीत पी. शंकरम्, विनीत देशपांडे यांचे आहे. तर गीतकार दीपक गायकवाड, गोवर्धन दोलताडे साजन बेंद्रे, गायक सलमान अली, आदर्श शिंदे, आनंदी जोशी, बेला शेंडे, संदीप उबाळे, विशाल चव्हाण हे आहेत. प्रेमाची अनोखी परिभाषा सांगणारा हा मजनू चित्रपट १० जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे.

संपूर्ण कुटुंबातील सदस्यांना हा चित्रपट आवडेल. "मजनू" चित्रपटात रसिकांना फाईट, एक्शन, रोमान्स तसेच लव्हस्टोरी अशा बऱ्याच गोष्टी पहायला मिळणार आहेत.

# डॉ. राजेंद्र मुंढे यांना विदर्भ विभागाचा दर्पण पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन 2022 च्या राज्यस्तरीय 'दर्पण' पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली आहे. वर्धा येथील ज्येष्ठ पत्रकार प्रा.डॉ.राजेंद्र मुंढे यांना विदर्भ विभागाचा दर्पण पुरस्कार जाहीर झाला आहे. संस्थेच्या वतीने अध्यक्ष रवींद्र बेडकिहाळ यांनी पुरस्काराची घोषणा केली.

प्रा.डॉ. राजेंद्र मुंढे यांनी वर्ध्याच्या सामाजिक, सांस्कृतिक,



शैक्षणिक क्षेत्रात गेल्या चार दशकात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महाविद्यालयीन जीवनापासून पत्रकारितेत प्रवेश करणाऱ्या डॉ. मुंढे यांनी साडेतीन दशके महाराष्ट्र टाइम्सचे प्रतिनिधी म्हणून कार्य केलेले आहे. त्यासोबतच सध्या नवशक्ती, प्रहार, पुढारी मुंबईतील इतर साप्ताहिके यासाठी मुक्त पत्रकारिता करीत आहेत.



# आनंदगावात साखर आयुक्त व प्रादेशिक संचालक यांची उसाच्या फडात काढली प्रेतयात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**संतोष जेथलिया**

**माजलगाव :** ऊस प्रश्न आणि गेवराई तालुक्यातील शेतकरी आत्महत्या प्रकरणी साखर आयुक्त व प्रादेशिक संचालक यांची 25 मे रोजी माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथे ऊसाच्या फडात प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढली.

थावरे म्हणाले की, गेवराई तालुक्यातील शेतकऱ्याने ऊसाच्या फडात ऊस पेटवून देऊन फाशी घेतली. त्याबद्दल दोषी साखर आयुक्त कार्यालय व प्रादेशिक सहसंचालक कार्यालय औरंगाबाद हेच असून त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. कारण की, दिनांक 16 ऑगस्ट 2007 रोजी साखर आयुक्त कार्यालय महा राज्य पुणे यांच्याकडून महत्त्वाचे परिपत्रक सर्व साखर कारखान्यांना पाठवण्यात आले होते की. शेतकऱ्यांनी ऊस लागवड केल्यानंतर ऊसाच्या नोंदीची पावती शेतकर्यांना देण्यात यावी, त्याची अंमलबजावणी साखर आयुक्त कार्यालयाने केली नसल्यामुळे, तसेच 265 जातींचा ऊस हा शेतकऱ्यांचा ऊस साखर कारखान्याने घेऊन जावा, कारण 265 जातीचा ऊस शेतकऱ्यांना परवडतो. एक महिना पाणी नसले चालते, रान डुकरे खात नाही, वजनदार भरतो यासर्व कारणांमुळे कारखानदार सदरील ऊस घेऊन जात नाही.

या संदर्भात जा.क्र. प्रासस/विकास / 285 ऊस/ 847/2017, प्रादेशिक सहसंचालक (साखर) औरंगाबाद, दिनांक 11 डिसेंबर 2017 या दोन्ही परिपत्रकाच्या आधारे असे दिसून येते की, साखर आयुक्त कार्यालय हे शेतकऱ्यांच्या बाजुने नाही

**अतिरिक्त उस प्रश्नावर शेतकरी संतापला**

व कारखानदारांध्याच बाजुने आहे. त्यामुळे नामदेव जाधव या शेतकऱ्यांचा बळी गेला आणि साखर आयुक्त कार्यालय हे कोटयावधी शेतकऱ्यांचे हित बघण्यासाठी निर्माण केलेले आहे. पण त्याठिकाणी शेतकऱ्यांचे हित नाही. शेतकऱ्यांचा बळी घेतला जातो म्हणून या दोन्ही कारणामुळे या शेतकऱ्यांचा बळी गेला व 265 जातीचा ऊस असल्यामुळे व नोंद नसल्यामुळे त्यामुळे बळी गेला. याची अमलबजावणी न झाल्यामुळे या शेतकऱ्यांचा बळी गेला म्हणून सदोष मनुष्य क्याचा गुन्हा दाखल करावी अशी आमच्याकडून मागणी होत आहे. तरी पुढील हंगामात तरी ऊसाच्या नोंदीची. पावती मिळावी व 265 जातीचा ऊस कारखानदाराने घेऊन जाण्यास भाग पाडावे याची अंमलबजावणी सरकारने साखर आयुक्त यांच्याकडून करून घेण्यात यावी. यासह जिल्ह्यातील ऊस प्रश्न आणि गेवराई तालुक्यातील शेतकरी आत्महत्या प्रकरणी साखर आयुक्त व प्रादेशिक संचालक यांची 25 मे रोजी माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथे ऊसाच्या फडात प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढली.

# उपअभियंता मिसाळ यांच्यावरील निलंबनाची कार्यवाही म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी : शेख अन्वर

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** आपल्या कार्यकाळात अत्यंत बिकट अवस्थेत असलेल्या माजलगाव महावितरण कार्यालयालीन कार्यक्षेत्रात काम करत असताना उत्कृष्ट व्यवस्थापन आणि भ्रष्टाचार मुक्त कामाची चुणूक दाखवणारे माजलगाव महावितरणाचे उप-अभियंता सुहास मिसाळ यांच्यावर काल निलंबनाची झालेली कार्यवाही म्हणजे निव्वळ चोर सोडून संन्याशाला फाशी अशी गत झाल्याचे रोखठोक प्रतिपादन अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे बीड जिल्हा कार्यकारी अध्यक्ष शेख अन्वर शमशुद्दीन (सोमठाणेकर) यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

पुढे शेख असेही म्हणाले की, मिसाळ हे जेव्हापासून माजलगाव महावितरणात रुजू झाले आहेत,तेव्हापासून लाईनमेन ते कार्यालयीन कर्मचारी लाच मागताना घाबरत होते. तसेच बिकट अवस्थेत सापडलेले माजलगाव तालुक्यातील लाईट खाते सुरळीत झाले होते. लाईट येण्याजाण्याचे प्रमाण खूपच कमी झाले होते. तालुक्यात कोठेही तांत्रिक बिघाड झाल्यास रात्री- बेरात्री देखील काही तासातच सुधार होत असे. थकबाकी वसुलीचे प्रमाण ही वीज ग्राहकाशी समन्वय व समवाय साधत मोठ्या प्रमाणात वाढले होते. परंतु अचानक झालेल्या निलंबनाच्या कार्यवाहीने ही परस्थिती पुन्हा जैसे थे होऊ शकते. म्हणून निलंबनाची कार्यवाही रद्द करून सन्मानपूर्वक श्री. मिसाळ यांना माजलगाव महावितरणात पुनश्च रुजू करून घेण्यात यावे.

मिळालेल्या माहितीनुसार २४ नोव्हेंबर २०२१ रोजी औरंगाबाद विभागाचे सह- व्यवस्थापक संचालक यांनी औरंगाबाद ते माजलगाव प्रवासादरम्यान सिरसदेवी ते माजलगाव या रोडवर अनेक लोकांनी हॉटेल, रस्त्यावरच्या पाण्याच्या मोटारी, फॅब्रिकेशन ची दुकाने वीज चोरी करत असल्याचे उप -अभियंता माजलगाव मिसाळ यांना सांगितले होते. तसेच योग्य ते ॲक्शन घेण्याचे निर्देश दिले होते. याच प्रमाणे वीज वसुली चे मोठे टार्गेट दिले होते.परंतु कोरोना कालखंड, शेतकऱ्यांचा ऊस गाळपास होणारा विलंब यामुळे याचा असर वीज वसुली वर पडले असतानाही १ कोटी एवढ्या मोठ्या प्रमाणात वीज वसुली ही करण्यात आली. परंतु पूर्वग्रहदूषित मानसिकता असलेले औरंगाबाद विभागीय सहाय्यक व्यवस्थापकीय संचालक यांनी अर्धवट माहितीच्या आधारे कर्तव्यनिष्ठ व उत्कृष्ट व्यवस्थापन करणारे सुहास मिसाळ यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करून एक प्रकारचा अन्याय केला आहे. अशी भावना माजलगाव तालुक्यातील सुज्ञ नागरिक व शेतकऱ्यांची झाली आहे. असेही शेवटी शेख अन्वर यांनी सांगितले. म्हणून ही निलंबनाची कार्यवाही लवकरात लवकर रद्द करून सुहास मिसाळ यांना कर्तव्य बजावण्याची पुन्हा एकदा संधी देण्यात यावी. असे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या वतीने आव्हान करण्यात येत आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी कवयित्री सोनाली जगताप यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मंठा जि. जालना येथे दिनांक 28 व 29 मे 2022 रोजी संपन्न होणाऱ्या 29 व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनात बहारदार कवी संमेलन होणार असून या कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी मुंबई (बांद्रा) येथील प्रसिद्ध कवयित्री आणि लेखिका सोनाली जगताप यांची निवड करण्यात आली आहे.

कवयित्री आणि लेखिका सोनाली जगताप यांची कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड ही एक नारी सन्मानाची बाब समजली जात आहे. त्यासाठी त्यांनी या पदास विनम्रपणे होकार दिला आहे. या कार्यक्रमाचे संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ. श्रीपाल सबनीस (ज्येष्ठ साहित्यिक) हे राहणार आहेत. या कार्यक्रमास राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष



फुलचंद नागटिळक, तसेच शुभांगी काळभोर उपस्थित राहणार आहेत. सकाळी नऊ वाजता ग्रंथदिंडी निघणार असून आमदार बबनराव लोणीकर व मंठाच्या नगराध्यक्षा मीराताई बोराडे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

सायंकाळी सहा वाजता कवी संमेलनात सोनाली जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार असून अनेक कवी कविता सादरीकरणासाठी सहभागी होणार असून संध्याकाळी नटसम्राट (नाट्य प्रयोग) सादर होणार आहे. कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी सोनाली जगताप यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.